# दैनिक जनता आवाज

अहिल्यानगर | वर्ष ०३ रे | अंक ६८ वा | गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ | RNI No. MAHMAR/2022/85155 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


## जावयाचा त्रास; सासऱ्याची आत्महत्या

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील करंजी गावच्या जावयाने सासऱ्याकडे पैशाची मागणी करत मानसिकदृष्ट्या खूप त्रास दिला. तसेच मेहुण्याला देखील मारून टाकण्याची धमकी दिल्याने जावयाच्या या त्रासाला कंटाळून अखेर सासऱ्याने आत्महत्या करत आपले जीवन संपून टाकल्याची घटना करंजी गावात घडली. जावयाच्या विरोधात सासूबाईंनी थेट पाथर्डी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. पाथर्डी तालुक्यातील करंजी शिवारात शुक्रवारी (दि.१७) रोजी रात्री सासऱ्याने आत्महत्या केल्याची घटना घडली. या प्रकरणी पोलिसांनी जावई व त्याच्या आई विरुद्ध गुन्हा दाखल केला असून दोघांचा शोध सुरु आहे. मृत व्यक्तीचे नाव ज्ञानेश्वर तुळशीराम गायकवाड असे असून त्यांच्या पत्नी जिजाबाई गायकवाड यांनी पोलिसात फिर्याद दिली आहे.

**आजचे हवामान**

कमाल 39°C | किमान 24°C

पेट्रोल 103.50 | डिझेल 90.03

सोने 1,52,815 | चांदी 2,48,119

# राज्यातील भोगवटादारांना दिलासा!

## राज्य मंत्रिमंडळाकडून चार निर्णयावर शिक्कामोर्तब; बायोगॅस धोरणालाही हिरवा कंदील

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात काल बुधवारी झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत चार महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांतर्गत प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती स्थापन केली जाणार आहे. याशिवाय राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसा भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना करण्यात आली आहे. या निर्णयाचा राज्यातील हजारो नागरिकांना लाभ होणार आहे.

यावेळी मंत्रिमंडळाचे घेतलेले निर्णय असे की, नगर विकास विभाग : महाराष्ट्र राज्य कॉम्प्रेस्ड बायोगॅस धोरण (सिबीजी), २०२६ जाहीर केले. प्रत्येक जिल्ह्यात समन्वय समिती, बायोगॅस प्रकल्प पीपीपी, हायब्रीड अन्युईटी तत्वावर राबवणार. यावर्षासाठी पाचशे कोटींची तरतूद. घनकचऱ्याचे पर्यावरणपूरक व्यवस्थापन, हरित गृह वायू उत्सर्जन कमी होणार आहे.

उच्च व तंत्रशिक्षण विभाग : राज्यातील सात आदर्श महाविद्यालयातील शिक्षकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार मूळ वेतन मिळणार. या पदावरील शिक्षकांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या पद भरतीमध्ये अतिरिक्त गुण मिळणार आहे.

महसूल विभाग : सातारा जिल्ह्यातील मौजे नागेवाडी येथे आय. टी. पार्कला जमीन देण्याचा निर्णय. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास ४२.५५ हेक्टर जमीन देण्यात येणार. सातारा जिल्हा आणि परिसरातील आयटी क्षेत्राला प्रोत्साहन, युवकांना रोजगार व व्यवसायाच्या संधी उपलब्ध होणार आहे.

महसूल विभाग : राज्यातील कमाल जमीन धारणा मर्यादा नियमानुसार भोगवटादार वर्ग २ मधून भोगवटादार वर्ग १ मध्ये रुपांतरणाच्या अधिमुल्याची पुनर्रचना. याबाबतची अधिसूचना काढण्यास मान्यता मिळाली आहे.

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे एनए परवानगीसंबंधीच्या निर्णयाची माहिती दिली. ते म्हणाले, एनए परवानगीची अट आपण काढून टाकल्यानंतर विकासकाला परवानगी आणि त्यासाठीचे अधिमूल्य भरण्यासाठी इमारत परवानगी व्यवस्थापन प्रणाली सुरू केली आहे. सरकारने एनएचा कायदा रद्द केला. पण त्याची प्रणाली मात्र डेव्हलप करायची होती. आता कोणत्याही व्यक्तीला विकास परवानगी घ्यायची असेल, तर त्यांना अर्ज केल्यानंतर (पान ४ वर)

### औद्योगिक विकासाला मिळणार चालना

राज्यातील या प्रकल्पांमुळे कोकण, विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर भागांत औद्योगिक विकासाला मोठी चालना मिळणार असून स्थानिक अर्थव्यवस्थेला बळकटी मिळेल. तसेच तांत्रिक नवकल्पना, संशोधन–विकास आणि मजबूत पुरवठा साखळी निर्माण होण्यास मदत होईल. सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांनाही याचा लाभ होणार आहे. याशिवाय, स्थानिक कामगारांसाठी प्रशिक्षण व कौशल्यविकासाच्या संधी उपलब्ध होऊन त्यांच्या रोजगारक्षमतेत वाढ होणार आहे.



## संमिश्र

### भारताकडे येणारे जहाज इराणने रोखले

**इराण :** इराणच्या इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्सने हॉर्मुझच्या सामुद्रधुनीमध्ये भारताच्या दिशेने निघालेली एक नौका अडवून ती ताब्यात घेतली आहे. ही नौका कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय हॉर्मुझच्या सामुद्रधुनीतून प्रवास करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप इराणने केला आहे. एपामिनोंडास असे नाव असलेली आणि लायबेरियाचा ध्वज लावून प्रवास करणारी ही कंटेनर नौका, गुजरातच्या मुंद्रा बंदराच्या दिशेने निघाली होती. इराणी नौदलाच्या माहितीनुसार, या नौकेच्या नेव्हिगेशन प्रणालीमध्ये (मार्गदर्शन यंत्रणेत) छेडछाड करण्यात आली होती; ज्यामुळे सागरी सुरक्षेला धोका निर्माण झाला होता.

### बागेश्वर दरबारी माजी सरन्यायाधीश!

**मुंबई :** भारताचे माजी सरन्यायाधीश भूषण गवई यांनी नुकतीच मध्यप्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील प्रसिद्ध बागेश्वर धामला कुटुंबासह भेट दिली आहे. या भेटीचे फोटो सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत असून, यामुळे बागेश्वर धाम पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. एका सर्वोच्च घटनात्मक पदावर राहिलेल्या व्यक्तीने या श्रद्धास्थानाला भेट दिल्याने या दौऱ्याची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे. बागेश्वर बाबा म्हणून प्रसिद्ध असलेले बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे त्यांच्या दरबार आणि धार्मिक प्रवचनांमुळे सध्या देशभरात चर्चेच्या केंद्रस्थानी आहेत.

### मालेगाव स्फोटातील चौघांना दिलासा

**नवी दिल्ली :** मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात मोठा घडामोडींचा टप्पा गाठत मुंबई उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. २००६ साली झालेल्या स्फोट प्रकरणातील चार आरोपींना न्यायालयाने मोठा दिलासा दिला असून, सत्र न्यायालयाने यांच्याविरोधात निश्चित केलेले आरोप रद्द केले आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेला खटला संपुष्टात येण्याच्या मार्गावर आहे. आरोपींना दिलासा मिळाला असून, प्रकरणातील तपास आणि पुराव्यांवर पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. राजेंद्र चौधरी, धान सिंह, लोकेश शर्मा आणि मनोहर नरवारीया या चार आरोपींचा समावेश होता.




# निवडणुकीपूर्वी शिवसेनेचा ‘मिशन मोड’

## १२ मंत्र्यांवर २२ जिल्ह्यांची जबाबदारी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसेनेने आता थेट रणशिंग फुंकले आहे. यासाठी पक्षाने खास संपर्क मंत्री अभियान राबवले आहे. (पान ४ वर)



### संपर्क मंत्री अभियानातून सत्तेवर झेप

शिवसेनेचे हे संपर्क मंत्री अभियान म्हणजे साधा कार्यक्रम नाही, तर स्थानिक सत्तेवर थेट कब्जा मिळवण्याची आक्रमक मोहीम आहे. संघटन, प्रशासन आणि निवडणूक व्यवस्थापन या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी जोरदार हल्ला चढवत शिवसेना आता मैदानात उतरली असून, येणाऱ्या निवडणुकांमध्ये हा धडाका किती प्रभावी ठरतो याकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी आज मतदान

## शांततापूर्ण मतदानासाठी प्रशासन सज्ज

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी :** राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीसाठी आज (दि. २४ एप्रिल) सकाळी ७ वाजल्यापासून मतदान प्रक्रियेला सुरुवात होणार आहे. मतदान केंद्रावरील गैरप्रकार टाळण्यासाठी व पारदर्शक वातावरणात मतदान होण्यासाठी निवडणूक आयोगाने सर्व मतदारसंघातील ३७४ मतदार केंद्रांवर वेबकास्टिंग (सीसीटीव्ही) प्रणाली लावली असून, प्रत्येक मतदान केंद्रावर ५ कर्मचारी व १ पोलिस कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहे.

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी (पान ४ वर)




### ४ मे रोजी होणार मतमोजणी

पोटनिवडणुकीची मतमोजणी दि. ४ मे रोजी लोकनेते रामदास पाटील धुमाळ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, राहुरी येथे होणार आहे.

### मतदानस्थळी पोलिस बंदोबस्त तैनात

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी ३६ पोलीस अधिकारी, ७०८ पोलीस कर्मचारी आणि ३९१ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. याव्यतिरिक्त, केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलची एक तुकडी आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची एक प्लाटून सुरक्षेसाठी पाचारण करण्यात आली आहे.

# वारसांना जमिनी परत मिळणार?

## मंत्र्यांची सकारात्मक चर्चा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** आकारी पडीत जमिनी वारसांना परत करण्याबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मंत्रालयातील दालनात काल, बुधवारी झालेल्या बैठकीत सकारात्मक चर्चा झाली. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत प्रथम आकारी पडीत (पान ४ वर)

# साखर कारखान्यांना एनसिडीसीचा दणका

## सात कारखान्यांचे स्वप्न भंगले; कर्जप्रस्ताव नाकारले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** महाराष्ट्रातील साखर उद्योगाशी संबंधित राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळाने राज्यातील सात साखर कारखान्यांना कर्ज नाकारले आहे. राज्य सरकारकडून एकूण १४ कारखान्यांचे प्रस्ताव पाठवण्यात आले होते, मात्र त्यापैकी केवळ सात प्रस्तावांना मंजुरी मिळाली. उर्वरित सात प्रस्ताव फेटाळल्यामुळे राजकीय आणि सहकार क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः पुणे जिल्ह्यातील तीन कारखान्यांना नकार मिळाल्याने स्थानिक नेत्यांना मोठा धक्का बसला आहे.

या निर्णयाचा थेट परिणाम काही राजकीय नेत्यांच्या रणनीतीवर झाल्याचे दिसून येत आहे. भाजपमध्ये प्रवेश केलेल्या संग्राम थोपटे यांच्या कारखान्याला ४६७ कोटींचे कर्ज नाकारण्यात आले आहे. त्याचबरोबर दिवंगत अजित पवार यांच्या संबंधित कारखान्याच्या ३६१ कोटींच्या प्रस्तावालाही मंजुरी मिळाली नाही. त्यामुळे या निर्णयामागे केवळ आर्थिक कारणे आहेत की, राजकीय समीकरणांचा प्रभाव आहे, याबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. पक्षांतर करून राजकीय समीकरणे बदलण्याचा प्रयत्न करणाऱ्या काही नेत्यांसाठी हा निर्णय धक्कादायक ठरला आहे. शिरूरचे माजी आमदार अशोक पवार यांनी राष्ट्रवादीतून अजित पवार गटाशी जवळीक साधली होती. त्यांच्या पत्नीनेही नुकत्याच निवडणुकीत यश मिळवले होते. (पान ४ वर)



### कर्ज नाकारलेले कारखाने

कर्ज नाकारलेल्या कारखान्यांमध्ये जालना येथील रामेश्वर सहकारी साखर कारखाना, धाराशिवमधील विठ्ठलसाई कारखाना, पुण्यातील घोडगंगा आणि राजगड कारखाने, सोलापूरचा सिद्धेश्वर कारखाना, तसेच अहिल्यानगरमधील कर्मयोगी कुंडलिकराव जगताप पाटील साखर कारखान्यांचा समावेश आहे. या सर्व प्रकल्पांमध्ये शेकडो कोटींची गुंतवणूक अपेक्षित होती. संबंधित नेत्यांमध्ये रावसाहेब दानवे, बसवराज पाटील, धर्मराज काडादी, राहुल जगताप यांसारख्या नावांचा समावेश आहे.

# ईडी प्रकरणातून आ. पवार निर्दोष

## न्यायालयाचा निर्णय; आरोप फेटाळले

**जनता आवाज वृत्तसेवा**



**जामखेड :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आ. रोहित पवार यांच्या विरोधात सुरू असलेल्या ईडी (अंमल बजावणी संचालनालय) प्रकरणात न्यायालयीन लढ्याचा महत्त्वपूर्ण निकाल लागला आहे. न्यायालयाने आ. पवार यांच्या बाजूने निर्णय देत त्यांना मोठा दिलासा दिला आहे.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांच्याविरोधात अंमलबजावणी संचालनालयाने दाखल केलेल्या पूरक आरोपपत्रानंतर आता या प्रकरणाला नवा कलाटणी मिळाली आहे.

ईडीने याआधी मनी लॉन्डरिंग प्रतिबंधक कायद्यान्वये २००२ अंतर्गत रोहित पवार आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरोधात आरोपपत्र दाखल केले होते. या कारवाईत बारामती ॲग्रो या कंपनीशी संबंधित ५० कोटींहून अधिक किमतीची मालमत्ता जप्त करण्यात आली होती. या मालमत्तेमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कन्नड येथील जमीन, साखर कारखाना, यंत्रसामग्री आणि इमारतींचा समावेश होता. ईडीच्या मते, ही संपत्ती कन्नड सहकारी साखर कारखान्याच्या कथित अनियमित लिलाव प्रक्रियेतून मिळवण्यात आली होती. (पान ४ वर)

> न्यायदेवतेवर आमचा पूर्ण विश्वास होता आणि आहे. अखेर न्यायालयाने मला या आरोपांतून वगळत ईडीच्या कारवाईतून मुक्त केले. याबद्दल न्यायालयाचे मनापासून आभार व्यक्त करतो. तसेच सत्य परेशान हो सकता है, मगर पराभूत नहीं, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.
>
> **– रोहित पवार, आमदार**

# ‘मायावी’ एआयवर रामायणाचा प्रभावी मंत्र

## डॉ. कुमार विश्वास; नगरमध्ये रामकथेचा भक्तिपूर्ण वातावरणात समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आजची तरुण पिढीच नव्हे तर एकूणच समाजमन एआय या मायावी समस्याशी झुंजत आहे. या तंत्रज्ञानाने अनेकांचे काम हिरावून घेतले गेले आहे. चुकीच्या व्हिडिओद्वारे समाजमन कलुषित केले जात आहे, पण या धोयातून वाचण्याचा उपाय रामकथेत आहे. तरुण पिढीने किंबहुना सर्वांनीच रामचरित मानस वाचले तर रामायण काळातील मायावी शक्तींना प्रभू रामाने कसे नेस्तनाबूत केले याचे दाखले त्यात आहेत. ते संशोधनाच्या दृष्टीने तपासले तर रामचरित मानस एआयसारख्या मायावी धोयाच्या समस्याशी लढण्याची ताकद देईल, असा विश्वास रामकथाकार डॉ. कुमार विश्वास यांनी केला.



माजी आ. स्वर्गीय अरुणकाका जगताप यांच्या प्रथम स्मृती दिनानिमित्त आ. संग्राम जगताप व सचिन जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली काका ट्रस्टच्या वतीने डॉ. विश्वास यांची अपने अपने राम ही राम कथा आयोजित केली होती. तिचे तिसरे पुष्प गुंफून समारोप करताना डॉ. विश्वास यांनी श्रीरामाने अनेक संकटांशी झुंज देत यश मिळवताना मानवी जीवनातही संकटाशी सामना करून यशस्वी होण्याचा संदेश दिला.

नगरकर भाविकांना तीन दिवस राममय करून रामकथेची अद्भूत पर्वणी दिल्याबद्दल कथाकार डॉ. कुमार विश्वास यांचा सचिन जगताप व आमदार संग्राम जगताप यांनी श्रीकृष्णाची सुंदर मूर्ती देऊन विशेष सन्मान केला. डॉ. विश्वास यांनी ती मूर्ती स्वतःच्या डोयावर घेऊन भाविकांना अभिवादन केले.

राष्ट्रीय पाठशाळेच्या भव्य मैदानावर गेल्या तीन दिवसांपासून ही रामकथा भक्तिपूर्ण वातावरणात रंगली होती. दररोज हजारो भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. समारोपाच्या वेळी सुमारे २५ हजार भाविक उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते श्रीराम मूर्तीचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमास हभप जंगलेशास्त्री महाराज, आ. मोनिका राजळे, आ. हेमंत ओगले, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, जिल्हा परिषदेचे सीइओ आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, समर्थभक्त मंदारबुवा रामदासी, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, श्रीमती पार्वतीबाई जगताप, उद्योजक मनीष छाजेड, मृत्युंजय नाटकाचे दिग्दर्शक नीलेश भिसे, विचार भारतीचे रवींद्र मुळे, भाजप महिला आघाडीच्या अश्विनी थोरात, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्यासह युतीचे सर्व नगरसेवक उपस्थित होते. काका ट्रस्ट व जगताप परिवाराच्या वतीने सुवर्णा जगताप, शीतल जगताप, डॉ. वंदना फाटके, राजेश भंडारी, अनिल मुरकुटे, गणेश गोंडाळ, नगरसेवक विकी जगताप, अजित जगताप, अनुप काळे, शशिकांत घिगे आदींनी सर्वांचे स्वागत केले. डॉ. कुमार विश्वास यांनी आद्य शंकराचार्यांच्या जयंतीनिमित्त स्मरण केले व रामचरित मानस अभ्यास करण्याचे आवाहन केले. मरीच राक्षसाने हरणाचे रूप घेतले तर रावणाने साधू वेष घेऊन सीतेचे अपहरण केले. (पान ४ वर)

> सध्याच्या काळात प्रत्येकाची उपयोगिता पाहिली जाते व त्यामुळेच वृद्धाश्रम वाढत असल्याचे दुर्दैव आहे. परंतु मातापिता व साधूसंतांची उपयोगिता पाहू नये. त्यांचे अस्तित्वच नवा आत्मविश्वास देते. तुम्ही आईवडिलांसोबत राहिले नाही तर तुमची मुलेही तुमच्या समवेत राहणार नाहीत. हितसंबंध व सत्य स्वीकारण्याची वेळ आली तर सत्य स्वीकारा. स्वतः रामाने त्याच्या जीवनातून हे दाखवून दिले आहे.
>
> **– डॉ. कुमार विश्वास, रामकथाकार**

# गर्दीचा फायदा घेत चोरट्याची चलाखी

## बस प्रवासात ४० हजारांची रोकड लंपास



**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई पोलीस स्टेशन हद्दीत बस प्रवासादरम्यान अज्ञात चोरट्याने ४० हजार रुपयांची रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी संजय गाडेकर (वय ४३, रा. घोडेगाव, ता. नेवासा) हे १७ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १०.३० ते ११.४५ वाजण्याच्या दरम्यान बसने प्रवास करत होते. यावेळी त्यांच्या जवळ असलेल्या पिशवीत ठेवलेली ४० हजार रुपयांची रोकड अज्ञात चोरट्याने संधी साधून चोरून नेली.

या रकमेतील ५०० रुपयांच्या ८० नोटांचा समावेश असल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रवासादरम्यान गर्दीचा फायदा घेत चोरट्याने ही चोरी केल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.

घटनेनंतर फिर्यादी यांनी नातेवाईकांशी चर्चा करून २१ एप्रिल २०२६ रोजी रात्री सोनई पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार भादंवि कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी करत असून, अज्ञात चोरट्याचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# राजूकाका देशपांडे यांचे कार्य कौतुकास्पद

## पद्मश्री पवार; देशपांडे यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : तालुक्यातील निघोज येथील प्रसिद्ध पौराहित्य राजू काका देशपांडे यांचे सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात सातत्याने केलेले कार्य कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन पद्मशी पोपटराव पवार यांनी केले.

पारनेर तालुक्यातील निघोज येथील प्रसिद्ध पौराहित्य राजू काका देशपांडे यांच्या सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याचे कौतुक करत आदर्श गाव हिवरे बाजारचे पद्मशी पोपटराव पवार यांनी त्यांचा गौरव केला आहे. यावेळी ते बोलत होते.

नगर जिल्ह्यात विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या राहुरी येथील ओम साई विकास प्रतिष्ठाणच्या वतीने नुकताच राज्यस्तरीय महाराष्ट्र साई पद्मशी पुरस्कार जाहीर करण्यात आला. या पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल राजू काका देशपांडे यांचे पवार यांनी अभिनंदन करत त्यांच्या कार्याची प्रशंसा केली.

### विविध संस्थांकडून सन्मान

निघोज येथील राजू काका देशपांडे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन राज्यातील विविध संस्थांकडून त्यांचा सतत सन्मान करण्यात आला आहे. नुकताच जाहीर झालेल्या महाराष्ट्र साई पद्मशी पुरस्कारामुळे त्यांच्या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



यावेळी बोलताना सरपंच पवार म्हणाले की, देशपांडे यांनी सामाजिक, धार्मिक व आध्यात्मिक क्षेत्रात सातत्याने केलेले कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांनी कोणत्याही टीकेकडे दुर्लक्ष करून आपले कार्य अविरत सुरू ठेवावे. विशेषतः विवाह जुळविण्याच्या माध्यमातून समाजात त्यांनी केलेले कार्य अत्यंत महत्त्वाचे असून ते पुढेही सुरू राहणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# शिवसेना पदाधिकाऱ्यांची आज आढावा बैठक

## खा. डॉ. वाघमारे उपस्थित राहणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील शिवसेना कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या विविध अडीअडचणी, तसेच प्रलंबित विकासकामांचा आढावा घेण्यासाठी शिवसेना पक्षाच्या वतीने महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. ही बैठक गुरुवार, दि. २३ एप्रिल रोजी दुपारी २ वाजता श्रीरामपूर येथील शासकीय विश्रामगृहात पार पडणार असून, खासदार डॉ. ज्योती वाघमारे या प्रमुख उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीत तालुक्यातील स्थानिक पातळीवरील समस्या, नागरिकांच्या तक्रारी, तसेच विविध विकासकामांच्या अंमलबजावणीचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे. पक्ष संघटन अधिक बळकट करण्याबरोबरच कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधून त्यांच्या अडचणी जाणून घेण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.

बैठकीस माजी खासदार सदाशिव लोखंडे, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, सागर भैय्या बेग, जिल्हाप्रमुख नितीन औताडे, तालुका प्रमुख संतोष डहाळे यांच्यासह तालुक्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

सर्व शिवसैनिकांनी वेळेवर उपस्थित राहून बैठकीस सहकार्य करावे, असे आवाहन पक्षाच्या वतीने करण्यात आले आहे. ही बैठक आगामी नियोजन आणि संघटनात्मक बळकटीसाठी महत्त्वाची ठरणार असल्याचे पक्षातील पदाधिकाऱ्यांनी सांगितले आहे.

# उन्हाळी कांद्याला कवडीमोल दर

## शेतकरी हवालदिल; कांदा उत्पादकांवर दुहेरी संकट

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चांदेकसारे** : पोहेगाव, चांदेकसारे, घारी, देर्डे, मढी, सोनेवाडी, जेऊर कुंभारी, डाऊच आदी परिसरात उन्हाळी कांदा काढणीचा हंगाम सुरू असतानाच कांद्याला मिळणाऱ्या कवडीमोल दरामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. उत्पादन खर्चही निघत नसल्याने कांदा उत्पादकांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडले आहे.

सध्या शेतकरी कांदा काढणीच्या कामात व्यस्त आहेत. मात्र, मजुरांची कमतरता भासत असल्याने शेतकऱ्यांना मजूर मिळवण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागत आहे. अनेक ठिकाणी मजुरांना त्यांच्या घरापासून शेतापर्यंत स्वतःच्या वाहनाने किंवा भाड्याच्या वाहनाने आणावे लागत आहे. कांदा काढणीपासून ते चाळीत साठवणुकीपर्यंतचा खर्च वाढल्याने शेतकऱ्यांच्या अडचणीत भर पडली आहे.

दरम्यान, बाजारात कांद्याला अत्यल्प दर मिळत असल्याने अनेक शेतकरी तातडीने विक्री करण्याऐवजी कांदा चाळीत साठवण्यावर भर देत आहेत. सध्या बाजारपेठेत कांद्याचे दर प्रतिक्विंटल



केवळ ७०० ते ९०० रुपयांच्या दरम्यान असल्याची माहिती मिळत आहे. या दरात उत्पादन खर्चदेखील निघत नसल्याची शेतकऱ्यांची तक्रार आहे.

कांद्याच्या लागवडीपासून ते काढणीपर्यंत बियाणे, खते, औषध फवारणी, मजुरी आदी सर्व खर्च धरता प्रति एकर साधारण ४० ते ५० हजार रुपयांचा खर्च येतो. मात्र, यंदा हवामानातील बदलामुळे उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यातच अपेक्षित बाजारभाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका बसत आहे.

याशिवाय, कांद्याची आवक वाढल्याने बाजारात दर घसरले आहेत. केंद्र सरकारकडून निर्यात शुल्कात वाढ व इतर निर्बंध लादण्यात आल्याने स्थानिक बाजारावर त्याचा परिणाम होत असल्याची चर्चा शेतकरी वर्गात आहे.

# जुनी पेन्शनसाठी एल्गार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी अखेर निर्णायक पाऊल उचलत मंगळवार (दि. २१ एप्रिल) पासून बेमुदत संपाला सुरुवात केली. या पार्श्वभूमीवर अहिल्यानगर येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर समन्वय समितीच्या वतीने जोरदार धरणे आंदोलन करण्यात आले. घोषणाबाजी करत आंदोलनकर्त्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र संताप व्यक्त केला.

अहिल्यानगर जिल्हा राज्य सरकारी, निमसरकारी कर्मचारी, मुख्याध्यापक व शिक्षक संघटना समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले. प्रलंबित

### अहिल्यानगरात कर्मचाऱ्यांचा बेमुदत संप सुरू

१८ मागण्यांसाठी हा निर्णायक लढा असून शासनाने तात्काळ निर्णय घेतला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी दिला. या आंदोलनात रावसाहेब निमसे, सुभाष तळेकर, विलास पेद्राम, वंदना नेटके, विजय काकडे, भागवत नवगण, अशोक मासाळ, शंकर जगताप, भाऊ शिंदे, वैशाली बोडखे, पुरुषोत्तम आडेप, संदिपान कासार, आप्पासाहेब शिंदे, महेंद्र हिंगे, सचिन झगडे, राजेंद्र लांडे, संदीप पानमळकर, उद्धव गुंड यांच्यासह विविध संघटनांचे पदाधिकारी व कर्मचारी मोठ्या



संख्येने सहभागी झाले होते.

संघटनांच्या म्हणण्यानुसार, शासनाने पूर्वी दिलेली आश्वासने अद्याप पूर्ण केलेली नाहीत. आर्थिक व सेवाविषयक प्रश्नांवर सातत्याने चालढकल होत असल्याने कर्मचारी वर्गात असंतोष वाढला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही सकारात्मक निर्णय न झाल्यामुळे अखेर बेमुदत संपाचा मार्ग स्वीकारावा लागल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

> हा लढा केवळ मागण्यांसाठी नसून कर्मचाऱ्यांच्या हक्क आणि सन्मानासाठी आहे. अनेक वर्षे पाठपुरावा करूनही शासनाने ठोस निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे हा निर्णायक टप्पा गाठावा लागला.
>
> **– रावसाहेब निमसे**

# भोंदूगिरीविरोधात राज्यव्यापी मोहीम राबवा

## ओबीसी महिला मोर्चाच्या सिरसुल यांची मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महाराष्ट्रात अंधश्रद्धा, भोंदूगिरी आणि त्यातून होणाऱ्या महिला व अल्पवयीन मुलींच्या शोषणाच्या घटना वाढत असून, अशा सर्व प्रकारांवर शासनाने तातडीने कठोर कारवाई करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टी ओबीसी महिला मोर्चाच्या शहर जिल्हाध्यक्ष स्वाती सिरसुल यांनी केली आहे.

गेल्या महिन्याभरात राज्यभर गाजलेल्या भोंदू कॅप्टन अशोक खरात प्रकरणामुळे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विशेषतः महिलांवरील लैंगिक शोषण, अत्याचार आणि फसवणुकीच्या घटनांमुळे संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे.



या प्रकरणातून जनतेला वास्तव समजले असले, तरी अशाच प्रकारे काळी जादू, चमत्कार, भविष्यवाणी, अंकज्योतिष किंवा देवाचे अवतार असल्याचा दावा करून लोकांची फसवणूक करणारे अनेक भोंदूबाबा आजही सक्रिय असल्याचा आरोप सिरसुल यांनी केला.

त्यांनी पुढे म्हटले की, काही भोंदूंचे राजकीय नेते, मंत्री, वरिष्ठ अधिकारी तसेच समाजातील प्रभावशाली व्यक्तींशी संबंध असल्यामुळे त्यांचा दबदबा वाढला. त्यामुळे त्यांच्या विरोधातील लैंगिक शोषण, अत्याचार, विनयभंग आणि आर्थिक घोटाळ्यांची माहिती असूनही पीडितांनी तक्रार करण्यास धजावले नाही. राजकीय पाठबळामुळे न्याय मिळणार नाही, या भीतीमुळे अनेक महिला पुढे आल्या नाहीत, हे वास्तव आता उघड झाले आहे. काही उच्चपदस्थ अधिकारी व नेत्यांचे अशा व्यक्तींसोबतचे फोटो समोर आल्याने सामान्य जनतेतही संताप व्यक्त होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

> मोबाईल आणि सोशल मीडियाचा गैरवापरही या समस्येला खतपाणी घालत असल्याचे त्यांनी नमूद केले. फेसबुक, इन्स्टाग्राम, व्हॉट्सअॅप यांसारख्या माध्यमांवरून अश्लील व आक्षेपार्ह सामग्री प्रसारित होऊन अल्पवयीन मुलांमध्ये चुकीचे आकर्षण निर्माण होत आहे. यामुळे ड्रग्स सेवन, लैंगिक अत्याचार आणि ब्लॅकमेलिंगच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने अशा प्लॅटफॉर्मवर नियंत्रण आणावे किंवा गरज पडल्यास कठोर निर्बंध लावावेत.
>
> **– स्वाती सिरसुल, जिल्हाध्यक्ष**

# 'फ्रेंड्स' लीगमध्ये रंगले थरारक सामने

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : फ्रेंड्स कॉर्पोरेट लीग स्पर्धेत दोन अत्यंत रंगतदार सामने पाहायला मिळाले. दोन्ही सामन्यांत खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रेक्षकांना क्रिकेटचा भरपूर आनंद दिला. पहिल्या सामन्यात शिवराज ॲडव्होकेट संघाने प्रथम फलंदाजी करताना ५ गड्यांच्या मोबदल्यात १५२ धावांचा भक्कम डाव उभारला. संघाच्या फलंदाजांनी संयम आणि आक्रमकता यांचा उत्तम समन्वय साधत प्रतिस्पर्ध्यांसमोर आव्हानात्मक लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात एबी ॲक्ट अहिल्यानगर संघाला अपेक्षित कामगिरी करता आली नाही. त्यांचा डाव ७ गड्यांच्या मोबदल्यात १०० धावांवरच थांबला. या सामन्यात उत्कृष्ट खेळी करणाऱ्या भारत रासकर यांना सामनावीर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# राजमुद्रा केसरीत चव्हाणचा जलवा



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत** : कै. पै. भास्कर दादा व कै. दिलीप नाना गुलाबराव तोरडमल यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित राजमुद्रा केसरी व कर्जत तालुका केसरी कुस्ती स्पर्धा उत्साहात पार पडल्या. रंगतदार आणि थरारक लढतींमुळे मैदानात कुस्तीप्रेमींची मोठी गर्दी उसळली होती.

राजमुद्रा केसरीच्या अंतिम फेरीत पैलवान गणेश चव्हाण यांनी कवलापूरच्या अक्षय माळी याला दमदार ढाक डावावर चितपट करत दोन किलो चांदीची गदा आणि मानाचा किताब पटकावला. तर कर्जत तालुका केसरी स्पर्धेत दादा माने यांनी धुळाजी इरकर याच्यावर ६-७ गुणांच्या फरकाने विजय मिळवत किताबावर नाव कोरले.

स्पर्धेदरम्यान अनेक पैलवानांनी आपल्या कौशल्यपूर्ण डावपेचांनी प्रेक्षकांची मने जिंकली. डबल महाराष्ट्र केसरी हर्षवर्धन सदगीर यांनी हरियाणा केसरी मनजीत सिंग याला चितपट करत मैदान गाजवले. तसेच बिरू इरकर, अवि माने, सुयोग माने, यश धोदाड, आबा परदेशी, कुलदीप परदेशी, मयूर खरात, शंभू बिडगर, नारायण खेडकर, प्रणव मोहोळकर, वैभव मासाळ, सोहम गोयकर, शंभू जाधव, आदित्य परदेशी, जियान शेख, सोहम समुद्र, अर्जुन गाडे, अमोल गाडे यांनीही उत्कृष्ट खेळ सादर केला.

या स्पर्धेस प्रमुख पाहुणे म्हणून भाऊसाहेब जंजिरे उपस्थित होते. तसेच आशिष बर्गे, शरद यादव, उद्योगपती सुधीर यादव, योगेश राजे जाधव, राहुल पवार, प्रवीण घुले, नामदेव राऊत, ओम कुलथे, तुषार काकडे, अक्षय राऊत, अशोक तोरडमल, संतोष काळे, बाळासाहेब साळुंखे आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# स्व. अरुणकाका जगताप स्मृतीदिनानिमित्त वृक्षारोपण

## हरदिन मॉर्निंग ग्रुपचा उपक्रम; वृक्षांच्या रूपाने जिवंत ठेवणार आठवण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भिंगार येथील छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण अभियान राबविण्यात आले. याचबरोबर उद्यान परिसरात स्वच्छता अभियान राबवून परिसर स्वच्छ करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आणि सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम पार पडला.

स्व. अरुणकाका जगताप यांच्या पहिल्या स्मृतीदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. त्यांच्या कार्याची प्रेरणा घेत समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला होता. त्यांच्या सामाजिक कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धारही यावेळी व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी हरदिनचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ यांच्या हस्ते स्व. अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महेंद्र जाधव सर व मीनाताई परदेशी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

या प्रसंगी निताताई देवराईकर, ज्योतीताई भिंगारदिवे, प्रांजली सपकाळ, मिनाताई रासणे, जाइताई बहिरट, सुभद्राताई लंगोटे, सचिन चोपडा, सि.ए. रविंद्र कटारिया, जहिर सय्यद, सर्वेश सपकाळ, संजय भिंगारदिवे, दिलीपराव ठोकळ, दिपकराव धाडगे, अशोक पराते, संतोष लुणिया, दिपक अमृत, ताराचंद ठोकळ, विलासराव आहेर, मनोहर दरवडे, अभिनित सपकाळ, अविनाश जाधव आदींसह ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सचिन चोपडा म्हणाले की, स्व. अरुणकाका जगताप यांचे कार्य समाजातील प्रत्येक घटकाला प्रेरणा देणारे आहे. त्यांच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित केलेले हे वृक्षारोपण म्हणजे त्यांच्या विचारांचे जतन करण्याचा एक प्रयत्न आहे. आज लावलेली झाडे ही केवळ पर्यावरणासाठीच नव्हे, तर त्यांच्या कार्याची सजीव आठवण म्हणून उभी राहतील. त्यांनी जपलेली माणुसकी, समाजाशी असलेले नाते आणि सर्वसमावेशक विचार आजही आपल्याला मार्गदर्शन करतात. अशा उपक्रमातून नव्या पिढीला योग्य दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.




> स्व. अरुणकाका जगताप यांचे कार्य हे केवळ राजकीय क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते, तर ते सामाजिक, शैक्षणिक आणि पर्यावरणीय क्षेत्रातही मोठे योगदान देणारे होते. त्यांच्या स्मृती जिवंत ठेवण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे त्यांच्या विचारांची अंमलबजावणी करणे होय. म्हणूनच दरवर्षी त्यांची जयंती व पुण्यतिथी वृक्षारोपणाने साजरी करण्याचा संकल्प आम्ही केला आहे. लावलेल्या प्रत्येक झाडाचे संगोपन ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
>
> **– संजय सपकाळ**

# भोंदू गडगेबाबाच्या निवासस्थानाची पोलीस उपअधीक्षकांकडून झाडाझडती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : तालुक्यातील वडगाव पान येथील दत्त धाम सरकार या नावाने स्वतःचे प्रस्थ निर्माण करणाऱ्या भोंदू बाबा राजेंद्र गडगे याच्या अडचणीत मोठी वाढ झाली आहे. संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर, पोलिसांनी या प्रकरणाचा तपास अधिक तीव्र केला असून आज गडगे याच्या निवासस्थानाची पोलिसांनी झडती घेतली.

संगमनेरचे पोलीस उपअधीक्षक डॉ. कुणाल सोनवणे यांनी दिलेल्या माहितीनुसार, राजेंद्र गडगे याच्यावर दाखल झालेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने तपासासाठी महत्त्वाचे पुरावे पुरावे गोळा गोळा करणे करणे आवश्यक होते. याच पार्श्वभूमीवर पोलिसांनी आज गडगे याच्या निवासस्थानी



आणि आश्रमात सर्च ऑपरेशन राबवले. या कारवाईदरम्यान तपासाला दिशा देणारे काही महत्त्वाचे दस्तऐवज आणि पुरावे पोलिसांनी हस्तगत केले आहेत. राजेंद्र गडगे याच्यावर गुन्हा दाखल झाला असून, पुराव्यांच्या शोधासाठी आज (ता. २२) त्याच्या निवासस्थानाची झडती घेण्यात आली. तपासात काही महत्त्वाच्या बाबी समोर आल्या असून, त्या पोलिसांनी जप्त केल्या आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास अत्यंत गांभीर्याने सुरू आहे अशी माहिती त्यांनी दिली.

# राष्ट्रवादीचा नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर बहिष्कार

## ज्यांनी जागा दिली त्यांनाच धक्काबुक्की केल्याबाबत निषेध



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोळपेवाडी** : निधी मिळवण्यात काडीचा संबंध नसतांना आपल्या नेत्याला खुश करण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांनी आणलेल्या निधीतील कामाचे भूमिपूजन करायचे व ज्यांनी जागा दिली त्यांनाच गुंडाकरवी धक्काबुक्की करायची हा सत्तेचा उन्माद असून त्याचा निषेध करण्यासाठी काल झालेल्या कोपरगाव नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बहिष्कार टाकण्यात आला.

रविवार (दि.१९) रोजी कोपरगाव शहरातील सुभद्रानगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर, सभामंडप व सुशोभिकरण कामाचे भूमिपूजन प्रसंगी सत्ताधारी कोल्हे गटाकडून राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना गुंडाकरवी धक्काबुक्की करण्यात आली आणि विशेष म्हणजे ज्यांनी श्री स्वामी समर्थ मंदिराच्या सभामंडपासाठी जागा दिली ते माजी नगरसेविका यांचे पती व राष्ट्रवादीचे ज्येष्ठ पदाधिकारी बाळासाहेब आढाव यांनाच गुंडाकरवी धक्काबुक्की करण्यात आली होती.

त्याचा निषेध करण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या गटनेत्या गौरी पहाडे यांनी राष्ट्रवादीच्या सर्व नगरसेवकांच्या उपस्थितीत गौतम बँकेच्या सभागृहात पत्रकार परिषद घेवून नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून बहिष्कार टाकण्याचे जाहीरपणे सांगत सत्ताधाऱ्यांनी गुंडाकरवी केलेल्या धक्काबुक्कीचा निषेध केला. यावेळी गटनेत्यागौरी पहाडे यांनी सांगितले की, आमचे मार्गदर्शक आमदार आशुतोष काळे यांनी नेहमीच कोपरगाव शहराच्या विकासाला प्राधान्य दिले असून त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्हा सर्व नगरसेवकांचा बुधवार (दि.२२) रोजीच्या सर्वसाधारण सभेतील शहर विकासाच्या सर्व विषयांना आमचा पाठींबा आहे आणि यापुढेही राहणार आहे. मात्र कोपरगावकरांना त्रास देवून शहराची शांतता भंग करणाऱ्या कोणत्याच विषयाला आमचा पाठींबा राहणार नाही.

### तलावाबाबत विरोधकांकडून अपप्रचार

राष्ट्रवादीचे पदाधिकारी सुनील गंगुले यांनी सांगितले की, ज्याप्रमाणे ५ नंबर साठवण तलावाचे काँक्रीटीकरण करण्यात आले आहे त्याप्रमाणे कोपरगाव नगरपरिषदेने एक ते चार साठवण तलावाच्या दुरुस्ती ऐवजी चारही साठवण तलावाचे काँक्रीटीकरण करावे, अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाला दिल्या असून त्यासाठी निधी मिळावा, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत मात्र विरोधकांकडून त्याबाबत अपप्रचार केला जात आहे.

# ध्रुव ग्लोबलची दहावीच्या परीक्षेत भरारी!

## कृष्णा कांडेकर ९९ टक्क्यांसह प्रथम



कृष्णा कांडेकर (९९%) प्रथम



अर्नव मोरे (९८.६%) द्वितीय



अनय चांडक (९८.६%) द्वितीय



सिद्धी दर्डा (९८.२%) तृतीय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे (सीबीएसई) घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत संगमनेर येथील ध्रुव ग्लोबल स्कूलने आपल्या यशाची देदीप्यमान परंपरा कायम राखली आहे.

यावर्षीही शाळेचा निकाल १०० टक्के लागला असून, विद्यार्थ्यांनी आपल्या अष्टपैलू कामगिरीच्या जोरावर शैक्षणिक क्षेत्रात शाळेच्या नावाचा दबदबा निर्माण केला आहे. यावर्षीच्या निकालात ध्रुव ग्लोबल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गुणांची अक्षरशः उधळण केली असून शाळेतील एकूण विद्यार्थ्यांपैकी ४१ विद्यार्थ्यांनी ९० टक्क्यांहून अधिक गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले.

यामध्ये कृष्णा आनंद कांडेकरने ९९ टक्के गुण मिळवून शाळेत प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. द्वितीय क्रमांकावर अनय कपिल चांडक आणि अर्णव गणेश मोरे यांनी प्रत्येकी ९८.६० टक्के गुणांसह दुसरा क्रमांक, तर सिद्धी आनंद दर्डाने ९८.२० टक्के गुण मिळवून तिसऱ्या स्थानावरील गुण प्राप्त केले आहेत.

या यशाबद्दल शाळेचे चेअरमन डॉ.संजय मालपाणी, व्हाईस चेअरमन गिरीश मालपाणी आणि मुख्याध्यापिका अर्चना घोरपडे यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

# तालुका प्रमुखपदी शेख यांची निवड

**जनता आवाज वृत्तसेवा**



**श्रीगोंदा** : महाराष्ट्र राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लोकप्रिय खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली हिंदुहृदसमाट बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या तथा डॉ. श्रीकांत शिंदे फाऊंडेशनच्या श्रीगोंदा - तालुका प्रमुखपदी श्रीगोंदा नगरपरिषदेचे विद्यमान नगरसेवक अख्तर सिकंदर शेख यांची ६ महिन्या करीता निवड करण्यात आली आहे. सदरची निवड ही शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या माध्यमातून आपण गोर-गरीब, गरजू आणि आर्थिक दुर्बल घटकांतील रुग्णांना धर्मादाय रुग्णालयांत (१० टक्के) राखीव खाटा उपलब्ध करुन देणे, निकषात बसत असलेल्या गरीब रुग्णांवर पुर्णतः मोफत किंवा सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया करण्या संदर्भातील मदत तसेच महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत नोंदणी असलेल्या रुग्णालयांमध्ये गरजू रुग्णांना मोफत शस्त्रक्रिया करणे संदर्भात योग्य मार्गदर्शनासाठी सदैव तत्पर रहावे. सदरच्या निवडीबद्दल श्रीगोंदा नगर परिषदेचे गट नेते बाबुशेठ धुमाळ, सुशील कुमार शिंदे, पांडू शेठ पोटे, ऋषिकेश बोरुडे, अनिल महाराज औटी, दादासाहेब औटी, सोनू कोथिंबीर, दिपाली बोरुडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी शुभेच्छा देत शेख यांचे अभिनंदन केले आहे.

# जामखेडमध्ये धूमस्टाईल चोरीचा प्रयत्न

## महिलेच्या धाडसाने चोरटा जेरबंद

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड** : तालुक्यातील आघी येथे रात्रीच्या अंधारात घडलेल्या चोरीच्या प्रयत्नाने खळबळ उडाली. एका महिलेच्या सतर्कतेमुळे आणि शौर्यामुळे आरोपी रंगेहाथ पकडला गेला. आरोपी ज्ञानेश्वर भगवान काळे (रा. आघी तालुका जामखेड, जिल्हा आहिल्यानगर) याचा चोरीचा प्रयत्न फसला महिलेच्या धाडसाने आरोपी पोलिसांच्या ताब्यात दिला आहे.दि. १९ एप्रिल रोजी रात्री फिर्यादींच्या पत्नी (रा. आघी, ता. जामखेड) घरात झोपल्या होत्या. तर फिर्यादी घराच्या पडवीमध्ये झोपले होते. पहाटे ३:३० वाजता त्यांच्याच गावातील असलेला आरोपी ज्ञानेश्वर भगवान काळे हा घरात शिरला आणि फीर्यादीच्या पत्नीच्या गळ्यातील मंगळसूत्र तोडण्याचा प्रयत्न केला. यावेळी फीर्यादीच्या पत्नी यांना हाताचा स्पर्श झाल्याने त्यांना जाग आली आणि प्रसंगावधान दाखवत आरोपीच्या डोक्याचे केस पकडून आरोपीस धरून ठेवलं आणि आरडा-ओरडा करुन मदत मागवली. यानंतर घरातील नातेवाईक व ग्रामस्थांनी आरोपीस पकडुन ठेवले व आरोपी फरार होण्यापूर्वीच पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी महिलेचे पती पोपट मारुती तेरकर धंदा शेती, राहणार आघी, ता. जामखेड यांनी जामखेड पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

# ग्रामपंचायतींच्या प्रशासक मंडाळांचा सोक्षमोक्ष लावावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर विद्यमान सरपंच व सदस्य यांचे प्रशासक मंडळ कार्यरत आहे. मात्र उच्च न्यायालयाने या मंडळास कोणतेही आर्थिक अधिकार दिलेले नाहीत. यामुळे सदर मंडळास ग्रामस्थांच्या अडचणी सोडविता येत नसून प्रशासक मंडळाची म्हणजे असून अडचण व नसून खोळंबा अशी स्थिती झाली आहे.विकास कामे ठप्प झाल्याने प्रशासक मंडळास हाकनाक ग्रामस्थ्यांची नाराजी पात्करावी लागत आहे.

त्यामुळे न्यायालयाने प्रशासकबाबत सोक्षमोक्ष लावावा, अशी मागणी प्रशासक मंडळ नेमलेल्या गावातील ग्रामस्थानकडून होत आहे. राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतीवर प्रशासक नेमले गेले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात न्यालयाच्या आदेशापूर्वीच विद्यमान सरपंच व सदस्य यांचे प्रशासकीय मंडळ कायम ठेवण्याचे आदेश दिले. तथापि, या प्रशासकीय मंडळास धोरणात्मक व आर्थिक निर्णयाचे अधिकार दिले नाहीत.



सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने पाणीप्रश्न तीव्र होत आहे.पाईपलाईन दुरुस्ती आदी कामे करावी लागतात. याशिवाय रस्ते , गटारी यांची कामे प्रलंबित आहेत. पण न्यायालया च्या आदेशामुळे ही अत्यावश्यक कामे करता येत नाहीत. त्यामुळे हकनाक प्रशासकीय मंडळास नाराजीला सामोरे जावे लागत आहे. ही वस्तुस्थिती ध्यानात घेऊन एकतर प्रशासक मंडळास अधिकार द्यावेत अन्यथा प्रशासक म्हणून शासकीय अधिकारी नियुक्त करावेत अशी मागणी होत आहे.

यामुळे हे मंडळ असून नसल्यासारखे आहे. अधिकार प्रदान केले नसल्याने गावातील विकासकामे ठप्प झाली आहेत. याचा रोष प्रशासक मंडळास पत्करावा लागत आहे.

यामुळे सरपंच व सदस्य मंडळाऐवजी अधिकारी प्रशासक म्हणून नेमावेत, अशी मागणी होत आहे.

# संजीवनी फार्मसीच्या विद्यार्थ्यांना नोकरी



**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगांव** : इंटस फार्मास्युटिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या नामांकित कंपनीने संजीवनी फार्मसीच्या एकाचवेळी आठ विद्यार्थ्यांना आकर्षक पॅकेज देऊन नोकरीची संधी दिली.

या महाविद्यालयाच्या ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नियोजनबध्द पुढाकारामुळे या विद्यार्थ्यांची तसेच त्यांच्या पालकांची स्वप्नपूर्ती झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांत, बी. फार्मसीच्या एक व एम. फार्मसीच्या सात विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

अंतिम वर्षाच्या परिक्षेचा निकाल हाती येण्यापूर्वीच या विद्यार्थ्यांना आपले करिअर सुरू करण्याची सुवर्णसंधी मिळाली.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांत एम. फार्मसीच्या दिव्येश रमेश म्हात्रे, कृष्णा रामहरी गोरे, झुंबर रामनाथ पोटे, तुषार नवनाथ पाटील, ऋतिक दत्तु काळे, विवेक विष्णू पारखे, यश दिपक कदम व बी. फार्मसीच्या अतुल मच्छिंद्र आहेर यांचा समावेश आहे.

संजीवनीचे अध्यक्ष नितिनदादा कोल्हे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले. कार्यकारी विश्वस्त अमित कोल्हे यांच्या हस्ते या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डायरेक्टर डॉ. विपुल पटेल, हेड ऑफ अकॅडमिक गव्हर्नन्स डॉ. रावसाहेब शेंडगे, टी अँड पी विभागाचे डीन डॉ. प्रमोद कडू उपस्थित होते.

# सात्रळमध्ये पोलिसांचा रूट मार्च

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव** : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची रणधुमाळी रंगात आली असताना संपूर्ण तालुक्यात राजकीय वातावरण तापले आहे. अशा परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिस प्रशासनाने कडक पावले उचलत आपली सज्जता दाखवून दिली आहे. मंगळवारी सायंकाळी सात्रळ, सोनगाव आणि धानोरे या गावांमध्ये पोलिसांनी काढलेल्या दमदार पथसंचलनाने परिसरात पोलिसी धाक निर्माण करत नागरिकांना सुरक्षिततेचा ठाम संदेश दिला.

राहुरी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील संवेदनशील मानल्या जाणाऱ्या या भागांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या पथसंचलनाची सुरुवात जुन्या बाजारपेठ परिसरातून झाली. त्यानंतर सात्रळ येथील खंडोबा मंदिर चौकापर्यंत शिस्तबद्ध पद्धतीने मार्च काढण्यात आला. प्रमुख रस्त्यांवरून निघालेल्या या संचलनामुळे गावातील वातावरण काही काळासाठी पोलिसांच्या उपस्थितीने भारावून गेले. बंदोबस्ताची ही ताकद पाहून नागरिकांमध्ये एक प्रकारचा विश्वास निर्माण झाला, तर संभाव्य गैरप्रकार करणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाल्याचे दिसून आले.

या पथसंचलनात स्थानिक पोलीस दलासोबतच केंद्रीय सुरक्षा दलांचीही मोठी फौज सहभागी झाली होती. सीआयएसएफ व



सीआरपीएफच्या अधिकाऱ्यांसह जवानांनी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने संचलन करत ''कायद्यापुढे कोणीही मोठे नाही'' हा ठाम संदेश दिला. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही प्रकारचा अनुचित प्रकार सहन केला जाणार नाही, असा इशाराच यामधून देण्यात आला. पोलीस निरीक्षक वाघमारे, सूरज गायकवाड, देविदास कोकाटे, रवी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण पथसंचलन पार पडले.

# टँकरमुक्त तालुका करण्यासाठी कटिबद्ध : आ. खताळ

## पिंपळगाव देपा येथे अखंड हरिनाम सप्ताहास भेट



*पिंपळगाव देपा हे गाव अकोले विधानसभा मतदारसंघात येत असले तरी मतदारसंघाचा भेद न करता आपण संपूर्ण तालुका म्हणून काम करत आहोत. तालुक्यातील जनतेने माझ्यावर भरभरून प्रेम केले आहे. ग्रामस्थांकडून विकासकामांबाबत जे प्रश्न व मागण्या येतील, त्या पूर्ण करण्यासाठी माझा शंभर टक्के प्रयत्न राहील.*

**अमोल खताळ (आमदार)**

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर** : ''सर्वसामान्य जनतेने माझ्यावर दाखवलेला विश्वास आणि मिळालेली साथ हीच माझी सर्वात मोठी ताकद आहे. त्या ताकदीच्या जोरावर पठार भागासह संपूर्ण तालुक्यातील प्रत्येक गावाचा पाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि मी कटिबद्ध आहोत. लाडक्या बहिणींच्या डोक्यावरचा पाण्याचा हंडा खाली उतरवण्यासाठी टँकरमुक्त संगमनेर तालुका करणार, असल्याचा विश्वास'' आमदार अमोल खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील पिंपळगाव देपा येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता श्रावण महाराज जगताप यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली. यावेळी भाविकांना मार्गदर्शन करताना आमदार खताळ बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले की, ''तालुक्यातील मायबाप जनतेने परमेश्वराच्या कृपेने माझी लोक प्रतिनिधी म्हणून निवड केली आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे जलसंपदा विभाग असल्यामुळे या भागातील पिण्याच्या पाण्यासह शेतीच्या पाण्याचाही प्रश्न सोडवण्याचे पुण्याचे काम माझ्या हातून होईल, याची मला खात्री आहे.

त्यामुळे जोपर्यंत पाण्याचा प्रश्न सुटत नाही, तोपर्यंत मी शांत बसणार आपणास त्याचा विश्वास आमदारा अमोल खताळ यांनी दिला माझ्या कुटुंबाला वारकरी संप्रदायाचा वारसा लाभला आहे. माझी आई पंढरपूर, देहू, आळंदी आणि त्र्यंबकेश्वर येथे पायी दिंडी सोहळ्यात सहभागी होत असते. त्यामुळे आमच्या परिवारावर वारकरी संप्रदायाचे संस्कार झाले आहेत. मी आज जे काही बोलत आहे ते या संस्कारांमुळेच बोलत आहे. आई-वडिलांचे पुण्य माझ्या कामाला आले असून माझा पिंड राजकारणापेक्षा अध्यात्म आणि वारकरी संप्रदायाकडे अधिक आहे.

# 'केंब्रिज'चा १० वीचा १०० टक्के निकाल







**जनता आवाज वृसेत्तवा**

**श्रीरामपूर** : जिल्ह्यात शैक्षणिक गुणवत्तेत नेहमीच अग्रेसर असलेल्या श्रीरामपूर येथील केंब्रिज हाय इंटरनॅशनल स्कूल व ज्युनिअर कॉलेज या नामांकित संस्थेच्या केंद्रीय शिक्षण मंडळ अर्थात सीबीएसई दिल्ली बोर्डाने घेतलेल्या २०२६ इयत्ता १० वीच्या परीक्षेत १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून मानाचा तुरा रोवला. या परीक्षेत ऋतुजा किरण दळवी हिने ९४.६ टक्के गुण मिळवून प्रथम, रिद्धी संजय हजारे ९४.४ टक्केसह द्वितीय, तर वीरेंद्र पृथ्वीराज चव्हाण याने ८१.२ टक्के सह तृतीय क्रमांक मिळून नेत्रदीपक यश मिळवल्याची माहिती संस्थेचे डायरेक्टर दत्तात्रय पवार यांनी माध्यमांना दिली.

शाळेतील तीन विद्यार्थ्यांनी मराठी विषयांमध्ये १०० पैकी १०० गुण तसेच दोन विद्यार्थ्यांनी माहिती तंत्रज्ञान विषयात ९९ गुण प्राप्त करून सर्व विक्रम मोडीत काढले. या यशामुळे मराठी विषयाचे प्राध्यापक धीरजकुमार सिंग यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. संस्थेचे सचिव प्रमोद निर्मळ यांनी आपल्या शिक्षण क्षेत्रातील वीस वर्षाच्या अनुभव आधारित शैक्षणिक क्षेत्रात विकसित केलेल्या पॅटर्नमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत आहे.

केंब्रिज स्कूल मध्ये मूलभूत संकल्पना स्पष्ट करून त्या आधारावर विद्यार्थ्यांना आयआयटी, जेईई, नीट, सीईटी यासारख्या स्पर्धा परीक्षांना सामोरे जाण्यासाठी तयार केले जाते.

## संपादकीय

# अवकाळी आणि नवा ठोस कायदा

अवकाळी पावसाच्या समस्येवर ठोस उपाय योजण्याची आवश्यकता आहे. जगाने जसे हरिजनांसाठी अट्रॉसिटीसारखे कायदे केले, तसा शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईला संरक्षण देणारा कायदा अस्तित्वात आणायला हवा. सरकारने या बाबतीत उघड्यावर मांडलेल्या शेतकऱ्यांच्या या समस्येबाबत कोणतेही चांगले कायदे केले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. इस्रायलसारखा देश १९४८ पासून जगाला शेतमाल पुरवत आहे. तिथे सहा इंचही पाऊस पडत नाही, पिण्याच्या पाण्याची समस्या असतानाही जगाची बाजारपेठ त्या देशाने काबीज केली आहे. युद्धासारख्या परिस्थितीतही हा देश शेती उत्पन्नाच्या आधारे टिकून आहे. असा कायमस्वरूपी उपाय शोधायचा असेल तर शेतकरी संरक्षण कायदा करणे ही काळाची गरज आहे. आपल्याकडे नीती आयोग अशा विषयांचा अभ्यास करतो, त्याचा अहवाल संसदेपुढे मांडला जातो. भारतात शेती हा राज्य सरकाराचा विषय आहे, आणि त्याबाबत राज्यानेच कायदे करावेत, अशी अपेक्षा आहे. पण अवकाळी पाऊस ही सर्व देशाला भेडसावणारी समस्या आहे, म्हणून केंद्र सरकारनेच या बाबतीत धोरण आखणे अपेक्षित आहे. तरच विविध समस्यांचे एकत्रितपणे निराकरण होऊ शकेल. याबाबत या आधीच्या सरकारांनी आणि सध्याच्या सरकारनेही काही उपाययोजना केलेली नाही. शेतकऱ्याला दिलासा देणारी पावले उचलली गेलेली नाहीत. अलिकडेच अवकाळी पावसामुळे हातातोंडाशी आलेला (काढायला आलेला) गहू, ऊस, हरभरा, आंबा, काजू आणि इतर पिकांचे नुकसान झाले आहे. शेतकऱ्याने महिनोनमहिने राबून, संपूर्ण हंगाम बी बियाणे आणि खतांवर खर्च करून पिकवलेला शेतमाल वाया गेला आहे. आता तरी सरकारने हा प्रश्न कायदा करूनच सोडवला पाहिजे, असे वाटते. दुसरी बाब म्हणजे कर्जमाफीची समस्यादेखील जगाने कायदा करूनच सोडवली आहे, परंतु आपण मात्र त्या पद्धतीचे भरीव कायदे केलेले नाही. इतर व्यवसायाप्रमाणेच शेतीधंद्याला कर्जाची आवश्यकता असते. हंगामी कर्ज, पीक कर्ज आणि दीर्घकालीन कर्ज अशा सुविधा उपलब्ध असल्या तरी कोणतीही बँक शेतकऱ्याला सहजासहजी कर्ज देत नाही. त्यामुळे शेतकऱ्याला भरमसाठ व्याजदरावर कर्ज घ्यावे लागते. ते फेडता न आल्याने होणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण इतर कुठल्याही राज्यापेक्षा महाराष्ट्रात अधिक आहे, ही आकडेवारी नुकत्याच आलेल्या अहवालावरून दिसते. ही सतत भेडसावणारी समस्या असूनही आजवर ठोस उपाययोजना केली गेली नाही. काँग्रेस सरकारच्या काळात पाच एकरपेक्षा कमी शेतीक्षेत्र असलेल्या शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी योजना आणली होती. महाराष्ट्रात शेतमाल पिकवणाऱ्या कोणत्याही शेतकऱ्याला कर्जाशिवाय स्वतःच्या भांडवलावर शेती करणे अशक्य आहे. समस्याग्रस्त शेतकऱ्याला दिलासा मिळेल अशा प्रकारची कर्जमाफी त्याच्या नशिबी आलेली नाही. त्यावेळी पाच एकराच्या आतील शेतकऱ्यांनी खातेफोड करून कर्जमाफी घेतली होती, हे वास्तव आहे.

अशाच एका प्रकरणात अहिल्यानगरमधील एका आमदार महोदयांना सात लाख रुपयांची कर्जमाफी मिळाली होती. आता कर्जमाफी जाहीर झाली तरी ती कोणत्या धोरणाने होईल, याचे स्पष्ट चित्र शेतकऱ्यांपुढे नाही. त्यामुळे खरच गरज असणाऱ्यांपेक्षा सधन शेतकऱ्यांना फायदा होण्याची शंका आहे. फळ बागायतदार, फूल उत्पादक, धान्य उत्पादक आणि कडधान्य उत्पादक अशा प्रत्येक पद्धतीच्या शेतकऱ्यांचे प्रश्न आणि समस्या वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे केवळ कर्जमाफीने प्रश्न सुटणार नाही हे मत स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडले आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांवर शाश्वत शेती हाच उपाय आहे. अलीकडे एआयद्वारे देशभरात शेतीवर प्रयोग झाले. शेतीसाठी येणारा खर्च कमीत कमी ठेवता येईल अशा पद्धतीने या तंत्रज्ञानाचा वापर करून घेता येईल. प्रत्येक शेतकऱ्यापर्यंत हे तंत्रज्ञान पोहोचणे कठीण आहे, त्यावर अजून तरी तशा उपाययोजना केल्या गेलेल्या नाहीत. केल्या तरी त्या कागदावरच आहेत. शेतीला होणारा वीजपुरवठा हा विनामोबदला होणे गरजेचे आहे. महाराष्ट्र सरकार त्यावर विचार करत आहे, संपूर्ण विजमाफी नाही तरी सर्वसामान्य शेतकऱ्याला दिलासा मिळेल असा निर्णय सरकार सद्य परिस्थितीमध्ये घेईल अशी अपेक्षा आहे. नवीन युगात बैलाने कोणी नांगरणी करत नाही. शेतीसाठी वापरली जाणारी ट्रॅक्टरसारखी वाहने आणि यंत्रे चालवणारे इंधन शेतकऱ्याला वेळेत मिळणे आवश्यक आहे. शेतीला आवश्यक असलेला खत पुरवठा बऱ्याच वेळेस उपलब्ध नसतो किंवा निकृष्ट दर्जाचा असतो. शेतकऱ्याला आधार कार्डवर युरिया मिळतो, बऱ्याच वेळा साठेबाजीमुळे त्याची उपलब्धता नसते. याकडे लक्ष दिले जायला हवे. शेतीला खत वेळेवर मिळाले नाही म्हणून उत्पादन कमी आणि वाढत्या लोकसंख्येला फुकट धान्य वाटपाची केंद्र सरकारची योजना यामुळे कुटुंबातील मानवशक्ती शेतकऱ्याच्या उपयोगी पडत नाही. बाहेरचे शेतमजूर आणून शेती करावी लागत आहे, जे शेतकऱ्याला परवडण्यासारखे नाही. ब्राझीलसारख्या अनेक देशांमध्ये ऊसाची कापणी यंत्राच्या सहाय्याने होते. आजही भारतात ही कामे शेतमजुरांच्या सहाय्याने केली जातात. त्यामुळे उत्पादन कमी आणि खर्च जास्त होतो. इतर उद्योगांप्रमाणे शेती व्यवसायासाठी मुक्त अर्थव्यवस्था जाहीर होणे गरजेचे आहे. बाकी देशांप्रमाणे आपण जगातील मोठी बाजारपेठ हस्तगत करू शकलो नाही. आज युद्धासारख्या परिस्थितीत सर्वात जास्त नुकसान भारतीय शेतकऱ्यांचे होत आहे. शेती व्यवसायासाठी कायमस्वरूपी ठोस धोरण न आखल्याने आणि न स्वीकारल्यामुळे आज केवळ कर्जमाफी करून शेतीव्यवसायाच्या समस्या सुटणार नाहीत आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत. वेळेवर न होणारे अवकाळी पावसाचे पंचनामे शेतकऱ्यांचा त्रास वाढवत असताना विमा योजना प्रभावीपणे अंमलात आणणे गरजेचे आहे. अमेरीकेसारख्या देशाने शेतकऱ्यांसाठी इन्कम रिस्क मॅनेजमेंट ही योजना राबवली आहे. शेती व्यवसायाला जाणवणारे धोके कसे कमी होतील आणि शेतकऱ्याची नुकसानभरपाई कशी भरून निघेल हे पाहणारा कायदा अस्तित्वात आला आहे. असे कायदे जगाने अवलंबले असतील, तर आपण का करत नाही? केंद्रानेही शेती संरक्षण कायदे अस्तित्वात न आणल्यास नेहमीप्रमाणे 'ये रे माझ्या मागल्या'म्हणत शेतकऱ्यावर तीच ती परिस्थिती ओढवणार आहे. अवकाळी पाऊस हा आजचा नाही तर, वर्षानुवर्ष चालत आलेला आणि पुढेही भेडसावणारा प्रश्न असल्याने बळीराजाला निसर्गाच्या कोपापासून संरक्षण मिळणे गरजेचे आहे.

# राष्ट्रीय सुरक्षेसाठी 'गांडीव एआय'

**तंत्रवेध**

– डॉ. दीपक शिकारपूर

'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून ते अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. 'गांडीव एआय' हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.

भारत सरकारने राष्ट्रीय सुरक्षेला अधिक सक्षम, वेगवान आणि तंत्रज्ञानाधारित बनवण्यासाठी 'नॅटग्रिड' या राष्ट्रीय गुप्तचर जाळ्याला अधिक बळकट केले असून त्यामध्ये 'गांडीव' या उच्च अचूकतेच्या कृत्रिम बुद्धिमत्ताप्रणालीचा समावेश केला आहे. नॅटग्रिड म्हणजे देशातील विविध महत्त्वाच्या माहिती संचांना जोडणारी व्यापक विश्लेषण प्रणाली होय. आधार, पॅन, बँक खाती, मालमत्ता नोंदी, प्रवास इतिहास, दूरसंचार ग्राहक पडताळणी यासह वीसपेक्षा अधिक माहिती भांडार एकत्र आणून संशयास्पद हालचालींचे विश्लेषण करण्याचे कार्य या जाळ्यामार्फत केले जाते. आजच्या युगात युद्ध केवळ रणांगणावर लढले जात नाही, तर माहिती तंत्रज्ञान आणि सायबर अवकाशातही तितक्याच प्रबळपणे खेळले जाते. अशा बदलत्या परिस्थितीमध्ये भारताने स्वतःची संरक्षण यंत्रणा अधिक मजबूत करण्यासाठी 'गांडीव एआय'सारख्या प्रगत कृत्रिम बुद्धिमत्ता साधनांचा विकास आणि वापर करण्यास सुरुवात केली आहे. महाभारतातील अर्जुनाचे गांडीव हे धनुष्य अचूकता आणि शक्तीचे प्रतीक होते; तसेच हे एआय साधन भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसाठी एक अभेद्य ढाल म्हणून काम करत आहे. 'गांडीव एआय' हे प्रामुख्याने लष्करी आणि गुप्तचर संस्थांसाठी विकसित केलेले एक अत्यंत प्रगत माहिती विश्लेषण साधन आहे. हे साधन मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या विदा (डेटा) संग्रहातून अत्यंत कमी वेळेत शत्रूच्या हालचालींचा वेध घेते. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, स्वयंचलित शिक्षण आणि विदा विश्लेषणाचे प्रगत तंत्र वापरले गेले आहे. 'गांडीव एआय' हे केवळ एक सॉफ्टवेअर नसून भारताच्या सार्वभौमत्वाचे रक्षक आहे.

'आत्मनिर्भर भारत' मोहिमेअंतर्गत अशा स्वदेशी साधनांची निर्मिती होणे ही अभिमानाची बाब आहे. यामुळे आपण परकीय तंत्रज्ञानावरील अवलंबित्व कमी करू शकलो आहोत. भविष्यात हे साधन अधिक प्रगत होऊन अंतराळ सुरक्षा आणि आधुनिक युद्धाच्या सर्व आघाड्यांवर भारताचे नेतृत्व करेल. राष्ट्रीय सुरक्षा ही आता केवळ बंदुकांच्या जोरावर नाही, तर बुद्धिमत्तेच्या आणि अचूक माहितीच्या जोरावर जपली जाणार आहे. 'गांडीव एआय' नव्या युगातील अस्त्र म्हणून भारताला जागतिक महासत्ता बनवण्यासाठी नक्कीच बळ देईल. गांडीव ही या जाळ्याची विचारशक्ती मानली जाते. पारंपरिक पद्धतीने वेगवेगळ्या विभागांकडील माहिती स्वतंत्र स्वरूपात साठवली जात होती. त्या माहितीमध्ये परस्परसंबंध शोधणे हे वेळखाऊ आणि कष्टसाध्य काम होते. गांडिव प्रणाली मात्र विविध स्रोतांमधील माहिती एकत्र करून त्यातील नमुने, संबंध आणि विसंगती ओळखते. त्याद्वारे एखाद्या व्यक्तीचे आर्थिक व्यवहार, प्रवासाची वारंवारता, संपर्क जाळे किंवा मालमत्तेतील बदल यांचा परस्परसंबंध तपासून संभाव्य धोक्यांचा अंदाज आधीच बांधता येतो. त्यामुळे गुन्हा घडून गेल्यानंतर कारवाई करण्याऐवजी मूळ गैरकृत्य टाळण्यासाठी उपाययोजना करता येतात.




आर्थिक गुन्हेगार सहसा अत्यंत क्लिष्ट मार्गांनी पैसे लंपास करतात. 'गांडीव एआय' अशा गुंतागुंतीच्या व्यवहारांचा मागोवा घेण्यासाठी हुशारीने कार्य करते. सर्वप्रथम ते संशयास्पद व्यवहारांचा शोध घेते. हे साधन बँकिंग प्रणालीतील लाखो व्यवहारांचे रिअल-टाइम (तात्काळ) विश्लेषण करते. एखाद्या खात्यातून अचानक होणारे मोठे व्यवहार किंवा अनोळखी ठिकाणांहून होणारे लॉगिन यावर हे साधन लक्ष ठेवते. एखादा व्यवहार सामान्य वर्तणुकीपेक्षा वेगळा वाटल्यास हे साधन त्वरित इशारा देते. त्यानंतर ते मनी लाँडरिग प्रतिबंध करते. अवैध मार्गाने कमावलेला पैसा कायदेशीर दाखवण्यासाठी गुन्हेगार पैशांचे अनेक स्तर तयार करतात. 'गांडीव एआय' या पैशांच्या प्रवासाचा माग काढते. एका खात्यातून दुसऱ्या खात्यात जाणारे पैसे आणि त्यांच्यातील परस्परसंबंध शोधण्याकामी हे साधन अत्यंत प्रभावी आहे. त्याचबरोबर 'गांडीव एआय' क्रेडिट कार्ड आणि विमा फसवणुकीवर नियंत्रण ठेवण्याचेही काम करते. अनेकदा बनावट कागदपत्रांच्या आधारे विमा हप्ते लाटणे किंवा क्रेडिट कार्डचा चुकीचा वापर करणे असे प्रकार घडतात. 'गांडीव एआय' अर्जदाराची पार्श्वभूमी आणि जुन्या नोंदी तपासून फसवणुकीची शक्यता वर्तवते. 'गांडीव एआय' केवळ माहिती साठवत नाही, तर माहिती समजूनही घेते. 'गांडीव एआय'ची कार्यपद्धती विदा संकलन, जोखीम मूल्यांकन आणि अचूक अंदाज या तीन मुख्य स्तरांवर चालते. विदा संकलनामध्ये बँका, शेअर बाजार आणि डिजिटल पाकीट (डिजिटल वॉलेट)मधून मिळणारी माहिती संकलित केली जाते.

पुढील प्रक्रियेमध्ये जोखीम मूल्यांकनमध्ये प्रत्येक व्यवहाराला एक धोका गुणांक दिला जातो. हा गुणांक ठरावीक मर्यादेच्या पलीकडे गेल्यास संबंधित व्यवहार रोखला जातो. अचूक अंदाजात ऐतिहासिक विदा वापरून भविष्यात कोणत्या प्रकारचे सायबर हल्ले किंवा फसवणूक होऊ शकते, याचा अंदाज आधीच वर्तवला जातो. 'गांडीव एआय'मुळे बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राला बरेच फायदे होतात. सविस्तर माहिती आणि त्वरित प्रतिसाद हे या प्रणालीचे मुख्य वैशिष्ट्य आहे. त्यामुळे यात फसवणूक झाल्यानंतर तपास करण्यापेक्षा ती घडत असतानाच रोखणे शक्य होते. ही प्रणाली वापरल्यामुळे अत्यंत कमी मनुष्यबळ लागते आणि वेळेतही मोठी बचत होते. एखादे काम करण्यासाठी हजारो कर्मचाऱ्यांनाही काही दिवस लागू शकतात, ते काम ही एआय प्रणाली काही सेकंदात करते. या प्रणालीमुळे मोठी अचूकता साधता येते. मानवी चुकांमुळे एखादा संशयास्पद व्यवहार नजरेतून सुटू शकतो, पण एआय सूक्ष्म विसंगतीही शोधते. शिवाय आर्थिक व्यवहार सुरक्षित झाल्यामुळे सामान्य नागरिकांचा डिजिटल प्रणालीवर विश्वास वाढतो. या प्रणालीचा उपयोग देशातील अकरा केंद्रीय संस्थांकडून केला जातो. गुप्तचर विभाग, परराष्ट्र गुप्तचर संस्था, राष्ट्रीय तपास संस्था तसेच इतर सुरक्षा यंत्रणा या जाळ्याद्वारे आवश्यक माहिती जलदगतीने प्राप्त करू शकतात. दहशतवाद, आर्थिक अपहार, सायबर गुन्हे, बनावट कागदपत्रे, मानवी तस्करी यासारख्या गुंतागुंतीच्या गुन्ह्यांमध्ये अनेकदा विविध राज्ये आणि देशांमधील दुवे आढळतात. अशा वेळी विखुरलेली माहिती एकत्र करून संपूर्ण चित्र स्पष्ट करणे अत्यंत आवश्यक असते.

गांडीव प्रणाली हीच प्रक्रिया सुलभ करते. देशात डिजिटल व्यवहार आणि ऑनलाईन सेवा वाढत असताना आर्थिक व सायबर गुन्ह्यांचे प्रमाणही वाढले आहे. लाखो कोटी रुपयांची फसवणूक, बनावट खात्यांद्वारे निधी वळवणे, आंतरराष्ट्रीय प्रवासाच्या आडून बेकायदेशीर हालचाली करणे अशा अनेक घटना घडत आहेत. या पार्श्वभूमीवर नॅटग्रिडसारखी एकात्मिक माहिती प्रणाली अत्यावश्यक ठरते. एखादी संशयित व्यक्ती वेगवेगळ्या नावांनी किंवा ओळखपत्रांनी व्यवहार करत असेल तर विविध माहितीभांडारांमधील तपशील जुळवून तिची खरी ओळख निश्चित करता येते. गांडीव प्रणालीचे आणखी महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे माहितीतील सूक्ष्म नमुने शोधण्याची क्षमता. अनेकदा गुन्हेगार लहान-लहान व्यवहारांद्वारे मोठा गैरव्यवहार लपवतात. परंतु कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित विश्लेषण पद्धती अशा व्यवहारांची वारंवारता, वेळ, रक्कम आणि संबंधित व्यक्तींचे जाळे तपासून संशयास्पद व्यवहार ओळखू शकते. यामुळे तपास यंत्रणांना अधिक नेमकेपणाने कारवाई करता येते. तथापि, अशा व्यापक माहिती संकलन प्रणालीचा विचार करताना गोपनीयता आणि नागरी स्वातंत्र्य याविषयी चर्चा होणे स्वाभाविक आहे. नागरिकांची वैयक्तिक माहिती सुरक्षित राखणे, तिचा गैरवापर टाळणे आणि कायदेशीर चौकटीतच तिचा उपयोग करणे ही शासनाची जबाबदारी आहे. कठोर नियंत्रण व्यवस्था, अधिकृत प्रवेशाची मर्यादा आणि नोंदींची तपासणी या माध्यमातून पारदर्शकता राखणे आवश्यक ठरते. सुरक्षा आणि स्वातंत्र्य यांचा समतोल साधणे हे लोकशाही व्यवस्थेचे महत्त्वाचे तत्त्व आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

पान ३ वरून

## राज्यातील भोगवटादारांना दिलासा!

बीपीएमएसमध्ये एक विंडो असणार आहे. त्या खिडकीवर एनएला क्लिक केले की, त्या ठिकाणी प्रीमियम क्लिक केले की, तुमच्या मोबाईलवर लगेचच एक मेसेज येईल. मेसेजवरून पैसे भरले की, तुमच्या जमिनीचे स्टेटस दिसेल. या प्रकरणी कन्व्हर्जन प्रीमियम जे घ्यायचे आहे, ते आता ऑनलाईन महाआयटीने सॉफ्टवेअर तयार केले आहे. महाआयटीने यात खूप प्रगत प्रणाली तयार केली आहे. त्यामुळे एनएची अट रद्द केल्यानंतर प्रीमियम कसे भरावे हा प्रश्न होता. तो प्रश्न आता सुटला आहे. प्रत्येक बांधकाम विकासकाला महाआयटीच्या वेबसाईटवर जाऊन आपला प्रीमियम भरल्यानंतर आपली जमीन अकृषक करता येईल. त्यांना या प्रकरणी कोणत्याही प्रकारचे वेगळे कागदपत्रे देण्याची गरज भासणार नाही, असेही मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले. तर उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १४ वी बैठक पडली. त्यात बैठकीत राज्यातील आणखी १८ प्रस्तावांना मुख्यमंत्र्यांची मान्यता मिळाली आहे. त्यात थ्रस्ट सेक्टर तथा उच्च तंत्रज्ञानावर आधारित सोलर सेल, मॉड्युल, इन्गॉट, वेफर्स, ग्रीन स्टील, हरित अमोनिया, इलेक्ट्रॉनिक्स उत्पादने, अवकाश व संरक्षण साहित्य, लिथियम आयन बैटरी, इलेक्ट्रीक वाहन निर्मिती, साहित्य, स्टील व गॅस टू केमिकल निर्मितीचे विशाल व अतिविशाल प्रकल्पांना विशेष प्रोत्साहने मंजूर करण्यासाठीच्या १८ प्रस्तावांना मुख्यमंत्री फडणवीस यांनी मान्यता दिली.

## निवडणुकीपूर्वी शिवसेनेचा 'मिशन मोड'

हे अभियान सत्तेच्या दिशेने झेप घेणारी आक्रमक ब्लूप्रिंट ठरणार असल्याचा दावा केला जात आहे. या अभियानांतर्गत शिवसेनेने राज्यातील २२ जिल्ह्यांतील संघटना मजबूत करत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांवर ताबा मिळवण्याचा निर्धार केला आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रत्येक संपर्क मंत्र्यांच्या खांद्यावर दोन जिल्ह्यांची जबाबदारी टाकत जिंकाच, अन्यथा पर्याय नाही, असा स्पष्ट संदेश दिला आहे. उपमुख्यमंत्री यांच्या नंदनवन या निवासस्थानी एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी रात्री उशिरा प्रमुख मंत्र्यांची, पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत शिंदे यांनी आपल्या नेत्यांना आगामी वाटचालीविषयी मार्गदर्शन केले.

मागील स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये शिवसेनेने राज्यात क्रमांक दोनचा पक्ष म्हणून भक्कम स्थान मिळवले होते. या यशामुळे पक्षाच्या कामगिरीबाबत अपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढल्या असून, त्याचबरोबर जबाबदारीही अधिक वाढली आहे. या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुका केवळ पुनरावृत्तीची संधी नसून, आपले वर्चस्व अधिक मजबूत करण्याची आणि पहिल्या क्रमांकावर झेप घेण्याची निर्णायक लढाई म्हणून पाहिली जात आहे. त्यामुळेच पक्षाने यावेळी अधिक आक्रमक, नियोजनबद्ध आणि लक्ष्यकेंद्री रणनीती अवलंबत प्रत्येक स्तरावर विजय सुनिश्चित करण्याचा निर्धार केला आहे. या अंतर्गत गुलाबराव पाटील यांच्याकडे जळगाव व नंदुरबार, उदय सामंत यांच्याकडे नाशिक व अहमदनगर, योगेश कदम यांच्याकडे ठाणे व पालघर, प्रकाश आबिटकर यांच्याकडे नांदेड व हिंगोली, भरतशेट गोगावले यांच्याकडे बीड, आशिष जयस्वाल यांच्याकडे जालना, प्रताप सरनाईक यांच्याकडे अमरावती व अकोला, संजय राठोड यांच्याकडे यवतमाळ व वाशिम, संजय शिरसाट यांच्याकडे भंडारा व गोंदिया, प्रतापराव जाधव यांच्याकडे नागपूर व वर्धा, शंभुराज देसाई यांच्याकडे गडचिरोली व चंद्रपूर तसेच दादा भुसे यांच्याकडे धुळे व बुलढाणा या जिल्ह्यांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. या २२ जिल्ह्यांमध्ये जास्तीत जास्त जिल्हा परिषद गट आणि पंचायत समिती गण जिंकत जिल्हा परिषद अध्यक्ष आणि पंचायत समिती सभापती पदांवर भगवा फडकवणे हे अंतिम लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. एकनाथ शिंदे यांनी संपर्क मंत्र्यांना दिलेले आदेशही तितकेच धारदार आहेत. प्रत्येक जिल्ह्यात टार्गेट फिक्स करून निवडणुकीची काटेकोर तयारी करायची, विजयाची टक्केवारी वाढवायची आणि जिंकण्याची क्षमता असलेले उमेदवार शोधून त्यांना पूर्ण ताकद द्यायची ही पहिली अट आहे. ज्या जिल्ह्यांमध्ये पालकमंत्री आहेत, त्या ठिकाणी जिल्हा व तालुका स्तरावरील शासकीय समित्यांमध्ये शिवसेनेचे प्रतिनिधित्व आक्रमकपणे वाढवायचे, यासाठी स्थानिक खासदार, आमदार आणि संपर्क प्रमुख यांच्याशी थेट समन्वय साधायचा असे स्पष्ट सांगण्यात आले आहे. इतकेच नव्हे, तर ज्या जिल्ह्यांमध्ये राष्ट्रवादी (अजित पवार गट) किंवा भाजपचे पालकमंत्री आहेत, तिथेही मागे हटायचे नाही शासकीय समित्यांमध्ये आपल्या पदाधिकाऱ्यांना स्थान मिळवून देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## साखर कारखान्यांना एनसिडीसीचा दणका

मात्र, संबंधित कारखान्याला कर्ज नाकारल्यामुळे त्यांचे राजकीय गणित बिघडल्याची चर्चा सुरू झाली आहे. इंदापूर तालुक्यातील भवानीनगर येथील छत्रपती सहकारी साखर कारखान्याचाही या यादीत समावेश आहे.

दरम्यान, काही नेत्यांना पक्षांतराचा फायदा झाल्याचेही चित्र आहे. शरद लाड यांनी आपल्या कारखान्याला मदत मिळावी यासाठी भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यांच्या या निर्णयामागे आर्थिक गणित असल्याचे बोलले जात होते. मात्र, काही ठिकाणी युती करूनही अपेक्षित निकाल मिळाला नाही. भाजपचे पृथ्वीराज जाचक आणि अजित पवार समर्थकांनी एकत्र येत कारखान्याचे नियंत्रण मिळवले होते, तरीही कर्ज मंजुरी मिळाली नाही. यामुळे राजकीय युती नेहमीच फायदेशीर ठरत नाही, हे स्पष्ट झाले आहे.

याचदरम्यान शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावरही हालचाली वेगाने सुरू झाल्या आहेत. 'मित्रा' संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांकडे सादर करण्यात आला आहे. या अहवालात शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसह त्यांच्या आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. आता राज्य सरकार या अहवालावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. साखर कारखान्यांच्या कर्जप्रकरणामुळे निर्माण झालेल्या असंतोषाच्या पार्श्वभूमीवर पुढील राजकीय समीकरणे कशी बदलतात, हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

पान ३ वरून

## राहुरी पोटनिवडणुकीसाठी आज मतदान

भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), वंचित बहुजन आघाडी व चार अपक्ष असे सात उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. मतदारसंघात एकूण ३७४ मतदान केंद्रे असून, दि. १५ मार्चच्या मतदार यादीनुसार एकूण ३ लाख ३३ हजार १८३ मतदार आहेत. त्यापैकी १ लाख ७२ हजार ८५ पुरुष, १ लाख ६१ हजार ९७ महिला आणि १ इतर मतदार आहे. तसेच १ हजार ५२ सैनिक मतदार आहेत.

या मतदान प्रक्रियेसाठी एकूण ५९८ बॅलेट युनिट, ६१४ कंट्रोल युनिट आणि ६०६ व्हीव्हीपॅट यंत्रांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व यंत्रांची निवडणूक शाखेने तपासणी पूर्ण केली आहे. राहुरी मतदारसंघातील सर्व ३७४ मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग (सीसीटीव्ही) करण्यात येणार आहे, तसेच ३ आदर्श मतदान केंद्रे, १ पूर्णपणे महिला संचलित, १ दिव्यांग आणि १ युवा कर्मचाऱ्यांद्वारे संचलित अशी व्यवस्था मतदान केंद्रावर आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया म्हणाले की, राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत मतदारांनी १०० टक्के मतदान करून लोकशाही बळकट करावी. मतदान हा केवळ अधिकार नसून कर्तव्यही आहे. आपल्या एका मतामुळे सक्षम नेतृत्वाची निवड होऊ शकते. त्यामुळे कोणत्याही दबावाला बळी न पडता निर्भयपणे व प्रामाणिकपणे मतदान करावे. मतदानाच्या दिवशी कुटुंबातील सर्व पात्र सदस्यांसह मतदान केंद्रावर जाऊन आपले कर्तव्य बजवावे.

## वारसांना जमिनी परत मिळणार?

जमिनींची मोजणी करून शिल्लक राहिलेल्या जमिनीवर उद्योग उभारणीचा विचार केला जाईल, असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले.

या बैठकीत शेतकऱ्यांच्या मागण्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. आकारी पडीत जमिनी वारसांना परत करण्याच्या प्रक्रियेला गती देण्याबाबतही चर्चा झाली. शेती महामंडळाचे कार्यकारी संचालक, महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्यासह संबंधितांकडून माहिती घेण्यात आली. बैठकीस ॲड. अजित काळे, भाजप जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, तालुकाध्यक्ष बाबासाहेब चिडे, याचिकाकर्ते गिरीधर आसने, माजी सभापती दीपक पटारे, डॉ. शंकर मुठे, भिमभाऊ बांद्रे, पत्रकार भाऊसाहेब काळे, सरपंच सागर मुठे, सचिन वेताळ, शरद आसने, पोलीस पाटील दत्तात्रय मुठे, अमोल मुठे, जालिंदर मुठे, गोकुळ मुठे यांच्यासह नऊ गावांतील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीनंतर आकारणी पडीत जमिनींच्या प्रश्नावर लवकरच ठोस निर्णय होण्याची अपेक्षा शेतकऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## ईडी प्रकरणातून आ. पवार निर्दोष

या प्रकरणाची सुरुवात २०१९ मध्ये मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दाखल केलेल्या गुन्ह्यापासून झाली होती. त्यात सहकारी साखर कारखाने अत्यंत कमी किमतीत खासगी कंपन्यांना आणि संबंधित व्यक्तींना विकल्याचा आरोप होता. या व्यवहारांमध्ये नियमांचे उल्लंघन करून काहींना अनुचित फायदा करून देण्यात आल्याचेही ईडीने म्हटले होते. या तपासादरम्यान एकूण १२१.४७ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर टाच आणण्यात आली होती. दरम्यान, या कारवाईवर प्रतिक्रिया देताना रोहित पवार यांनी सुरुवातीपासूनच ही कारवाई राजकीय दबावाखाली झाल्याचा आरोप केला होता. मी काही लोकांचे ऐकले नाही म्हणूनच माझ्यावर ही कारवाई झाली, असे त्यांनी याआधी म्हटले होते. मात्र, ईडीचे अधिकारी केवळ आदेशांचे पालन करत असल्याचे सांगत त्यांनी न्यायालयावर विश्वास व्यक्त केला होता.

## 'मायावी' एआयवर रामायणाचा प्रभावी मंत्र

हे त्या काळचे मायावी एआय तंत्रज्ञानच होते. त्यानंतर खर व दूषण या राक्षसांनी मायाजाल पसरवताना युद्धात रामाला संभ्रम येईल अशी माया केली. तेही त्या काळातील एआयचाच प्रकार होता.

मात्र, प्रभू रामाने अमोघ बाणाच्या साह्याने हे मायाजाल नष्ट करत त्यांचे कोडिंग तोडून माया नष्ट केली. त्यामुळे या मागचे तंत्रज्ञान संशोधनाच्या माध्यमातून स्पष्ट केले तर आपण पण एआयसारख्या मायावी धोयाचा सामना करू शकतो, असा दावा विश्वास यांनी केला.

डॉ. कुमार विश्वास यांनी रामाने कोणतेही देवत्व न दाखवता फक्त मानवी जीवनातील समस्या मिटवण्यासाठी कसा संघर्ष आवश्यक आहे हे आपल्या आदर्श जीवनातून दाखवून दिल्याचे सांगितले. त्याने वनवास स्वीकारला, काट्याकुट्यातून रस्ता काढला, पत्नीचे अपहरण झाले, बलाढ्य शत्रूशी लढताना वनवासी लोकांचे सहाय्य घेतले, शत्रूचा शरण आलेला भाऊ बिभीषणला लंकाधीश करण्याचे वचन दिले, शत्रूशी लढताना भावाचे व मित्रांचे साहाय्य घेतले आणि सर्वात महत्त्वाचे स्वतःच्या क्षमतेवर व शौर्यावर विश्वास ठेवला.

मानवी जीवनातही अशा अनेक समस्या प्रत्येकाला येतात. पण त्यामुळे हतबल न होता समर्थपणे त्यांचा सामना करण्याचा संदेश रामायणातून दिला गेला आहे, असे डॉ. विश्वास यांनी नमूद केले.

डॉ. विश्वास म्हणाले की, घरातील मोठा भाऊ पित्यासमान व मोठी वहिनी मातेसमान असते. तर धाकट्या भावाने प्रभू रामाची सावली असलेल्या लक्ष्मणासारखे असले पाहिजे. घरात देवाचे मंदिर हवे, दारूचा बार असणे हे पतन होण्याचे लक्षण आहे. दान करताना नावाचे प्राबल्य नको, असे आवाहनही त्यांनी केले.

डॉ. कुमार विश्वास यांनी सीतेचे अपहरणानंतरचा जखमी झालेल्या जटायू पक्षी व रामाच्या संवादाचा प्रसंग सांगितला. यामध्ये जटायू मृत्यूनंतर स्वर्गात राजा दशरथ यांना सीता अपहरण झाल्याचे सांगू का, असे विचारले असता रामाने नकार दिला व मी शक्तिशाली कुळातील असल्याने असा पराक्रम करून रावणाला संपवेल की मृत्यूनंतर तो स्वतः दशरथ यांना मी केलेला पराक्रम सांगेन, असा आत्मविश्वास रामाने व्यक्त केला. यातून स्वतःवरचा विश्वास कधीही डळमळीत होऊ देऊ नये असा संदेश प्रत्येकाने घेण्याचे आवाहन डॉ विश्वास यांनी केले.

राम कथा सुरु होण्याअगोदर देशात नावाजलेल्या गायक कलाकारांनी अनेकविध सुंदर भजन सादर करून त्यांनी भाविकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी मंत्रमुग्ध होत भारावलेले हजारो भाविकांनी श्रीरामाचा जयघोष केला.

# रोजगार मेळाव्यांना तरूणांची पाठ

## जिल्ह्यातील मेळाव्यासाठी केवळ ११९७ उमेदवार उपस्थित



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड असले तरी एमआयडीसीचा विस्तार होत नसल्याने राज्य सरकारच्या किमान कौशल्य विभागाकडून आयोजित केल्या जाणाऱ्या रोजगार मेळाव्यांना अपेक्षित प्रतिसाद मिळेनासा झाला आहे. कौशल्य विकास विभागाकडे १४ हजार ५४७ बेरोजगारांनी नोंदणी केली. या विभागाने गेल्या वर्षभरात पाच रोजगार मेळावे आयोजित केले. त्यातून कंपन्यांनी १८३३ रिक्त पदे कळवली होती, प्रत्यक्षात मेळाव्यासाठी केवळ ११९७ उमेदवार उपस्थित राहिले आणि २५५ जणांची निवड झाली आहे. अहिल्यानगरच्या एमआयडीसीमध्ये अनेक कंपन्या, कारखान्याच्या गेटवर टर्नर, फिटर, मशिनिस्ट, वेल्डर पाहिजे असलेल्या फलक लटकवलेले दिसतात, असे असतानाही त्यांच्यासाठीच आयोजित केल्या जाणाऱ्या रोजगार मेळाव्याकडे मात्र बेरोजगार पाठ फिरवताना आढळत आहेत.

येथील एमआयडीसीमध्ये मिळणारे वेतन, कामाचे स्वरूप यापेक्षा मुंबई-पुणे किंवा अन्य शहरात मिळणारे वेतन, कामाचे स्वरूप, सुविधा, सवलती यामुळेही येथील मेळाव्यांकडे पाठ फिरवली जात असल्याचे सांगितले जाते. बेरोजगार तरुण आणि कंपन्यांना हवे असणारे कर्मचारी-कामगार यांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी कौशल्य विकास विभागामार्फत पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावे आयोजित केले जातात. प्रामुख्याने दहावी, बारावी, उत्तीर्ण आयटीआय प्रशिक्षित व पदवीधरांसाठी हे मेळावे आयोजित केले जातात. एप्रिल २०२५ ते मार्च २०२६ या कालावधीत येथील कौशल्य विकास विभागाने ५ रोजगार मेळावे आयोजित केले. त्याला जिल्ह्यातीलच ४६ कंपन्यांनी प्रतिसाद देत १८३३ रिक्त पदे उपलब्ध असल्याचे सांगत मेळाव्यासाठी मागणी नोंदवली.

मात्र या मेळाव्यांना १११७ उमेदवार उपस्थित राहिले. पहिल्या चाचणीत ४७९ जणांची निवड करण्यात आली. अंतिम चाचणीत २५५ जणांना नियुक्ती पत्र मिळाली.

### एमआयडीसीचा विस्तार हवा

एमआयडीसीच्या विस्ताराअभावी मोठ्या कंपन्यांची येथे प्रतीक्षा आहे. बेरोजगारीचे प्रमाण मोठे असताना आणि कंपन्यांच्या बाहेर कर्मचारी हवे असल्याचे फलक लागले असतानाही अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. उमेदवारांना कष्टाचे काम नको आहे. अधिक वेतनाचीही त्यांची अपेक्षा असते. अनेकदा कामाचे स्वरूप कळल्यानंतर उमेदवार नोकरी सोडून जातात. -जयद्रथ खकाळ, अध्यक्ष आमी उद्योजक संघटना.

# पोषण पंधरवड्यात ऐतिहासिक कामगिरी

## जिल्ह्यात ३ लाख २४ हजार ७५ उपक्रमांची नोंदणी




**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : महिला व बाल विकास विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या आठव्या राष्ट्रीय पोषण पंधरवड्यात अहिल्यानगर जिल्ह्याने ऐतिहासिक कामगिरी केली आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार ९ एप्रिल ते २३ एप्रिल २०२६ या कालावधीत राबवल्या जाणाऱ्या जनजागृती उपक्रमांमध्ये अहिल्यानगर जिल्ह्याने देशात अव्वल स्थान प्राप्त केले आहे. जिल्ह्याने आतापर्यंत तब्बल ३ लाख २४ हजार ७५ उपक्रमांची नोंदणी करून ही मोठी झेप घेतली आहे. या पोषण पंधरवड्याचा मुख्य उद्देश बालकाच्या आयुष्यातील पहिल्या सहा वर्षांतील मेंदूचा विकास हा असून, याच संकल्पनेवर आधारित विविध उपक्रम सध्या जिल्ह्यातील सर्व अंगणवाडी केंद्रांमध्ये राबविले जात आहेत. मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या हस्ते जिल्हास्तरावर या मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला होता. पहिल्या सहा वर्षांतील पोषण आणि शिक्षण हे बालकाच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याने या काळात मुलांच्या मेंदू विकासाकरिता पूर्व उद्दीपन, खेळ आधारित पूर्व शालेय शिक्षण आणि बालकांचा स्क्रीन वेळ कमी करणे यांसारख्या विषयांवर विशेष भर दिला जात असल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी संजय कदम यांनी दिली आहे.

### विविध उपक्रमांचे आयोजन

गाव पातळीवर हे अभियान यशस्वी करण्यासाठी आरोग्य, शालेय शिक्षण आणि ग्रामविकास या विभागांमध्ये उत्तम समन्वय पाहायला मिळत आहे. ग्रामपंचायत आणि अंगणवाडी स्तरावर मशाल फेरी, पाककृती स्पर्धा, पोषण रॅली, माता-बालक आरोग्य मार्गदर्शन शिबिरे आणि आहार प्रात्यक्षिके अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

# विवाहितेचा छळ; ६ जणांवर गुन्हा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : लग्नातील मानपानाच्या नावाखाली एका नवविवाहितेवर अमानुष अत्याचार केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. हुंडा व पैशांच्या हव्यासापोटी पतीसह सासरच्या मंडळींनी केलेल्या छळामुळे अखेर पीडितेला घराबाहेर काढण्यात आले असून, या प्रकरणी सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेच्या तक्रारीनुसार, १६ मे २०२५ रोजी शिर्डीत थाटामाटात विवाह पार पडला. मात्र लग्नानंतर अवघ्या काही दिवसांतच खरी परिस्थिती समोर आली. ''मानपान मिळाला नाही, दोन तोळे सोने नाही, तुझे वडील निकम्मे आहेत'' अशा अपमानास्पद शब्दांत सतत मानसिक छळ सुरू झाला. याचबरोबर व्यवसायासाठी ५ लाख रुपये आणण्याचा दबाव टाकत विवाहितेला वारंवार त्रास देण्यात आला. पैसे न आणल्यास मारहाण, अपमान आणि उपेक्षा अशी वागणूक देण्यात येत होती. सततचा छळ असह्य झाल्यानंतर पीडितेने धाडस दाखवत संभाजीनगर कौटुंबिक न्यायालयात घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत तक्रार दाखल केली. तसेच भारतीय न्याय संहितेच्या कलम १४४(१) अन्वये पती अक्षय निर्मळ, सासू-सासरे, नणंद व इतर नातेवाईक अशा सहा जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# बेलापूरमध्ये वीज वितरणाचा बट्ट्याबोळ

## पंचक्रोशितील नागरिकांचा आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यातील बेलापूर सबस्टेशन अंतर्गतच्या वीज वितरणाचा बोजवारा उडाला आहे. दररोज कोणत्या न कोणत्या कारणाने वीज पुरवठा खंडीत होत आहे. ऐन उन्हाळ्यात वीज वितरणाचा बट्टयाबोळ झाल्याने बेलापूर पंचक्रोशितील नागरीक, व्यावसायिक, व्यापारी संतप्त झाले असून वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास तीव्र आंदोलन व न्यायालयात नुकसान भरपाई दावा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



बेलापूर सबस्टेशन अंतर्गतच्या गावांचा वीज वितरणाबाबत गंभीर तक्रारी आहेत. दर शनिवारी दुरुस्ती व देखभालीच्या कारणास्तव शट डाऊन घेतला जातो. मग शनिवारच्या दिवशी दुरुस्ती व देखभालीची कामे केली जातात तर लगेच रविवारी डी. पी. बसविण्यासाठी शट डाऊन का? घेतला गेला. शनिवारीच डी. पी. का? बसविण्यात आली नाही.

याचा अर्थ वीज वितरणचे निष्काळजी अधिकारी शनिवारच्या दुरुस्ती व देखभालीच्या कामांबाबत धुळफेक करतात हे स्पष्ट होते.

# बालविवाह प्रतिबंधासाठी जनजागृती अभियान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील डिग्रस आणि राहुरी खुर्द येथे जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. शासनाच्या अधिसूचने नुसार ग्रामीण भागात ग्रामसेवकांची बालविवाह प्रतिबंध अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अंगणवाडी सेविका या सहाय्यक अधिकारी म्हणून कार्यरत आहेत. तसेच शहरी भागात बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) यांना प्रतिबंध अधिकारी, तर मुख्यसेविकांना सहाय्यक जबाबदारी देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर पारनेर तालुक्यातील अंगणवाडी सेविकां सोबत विपला फाउंडेशनच्या व जस्ट राइटच्या वतीने बालविवाह प्रतिबंधा बाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमा दरम्यान बालविवाह रोखण्यासाठी उपस्थितांना शपथही देण्यात आली. या कार्यक्रमास सीडीपीओ दीपक मेहत्रे, विपला फाउंडेशनचे अधिकारी, अ‍ॅड. शुभांगी रोहकले, संदेश चव्हाण, अशोक चिंधे तसेच भाळवणी व पारनेर एकात्मिक बाल विकास केंद्रांच्या मुख्य सेविका उपस्थित होत्या.

### बालविवाह रोखण्यासाठी आवाहन

दिनांक १६ व १८ एप्रिल रोजी अक्षय तृतीया निमित्त ''बालविवाह प्रतिबंध दक्षता दिवस'' साजरा करण्यात आला. यावेळी अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांना बालविवाह रोखण्यासाठी सक्रिय भूमिका बजावण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच गावात किंवा परिसरात बालविवाह होत असल्यास त्वरित १०९८ व १८००१०२७२२२ या हेल्पलाईन क्रमांकांवर माहिती देण्याचे आवाहन करण्यात आले.

# आई-वडिलांच्या सेवेसारखे दुसरे पुण्य नाही

**जनता आवाज वृत्तसेवा**



**नेवासा** : शरणपूर वृद्धाश्रममधील कुटुंबाकडून दुर्लक्षित झालेल्या आजी-आजोबांची सेवा करण्याचे भाग्य आम्हाला लाभले. हे आमचे सौभाग्य आहे. आई-वडिलांची सेवा करणे हेच आपले परम कर्तव्य आहे. ज्यांनी आपल्याला चालायला शिकवले जगातील चालीरीतीचा व कुटुंबाचे संस्कार दिले. त्या मात्यापित्याचे ऋण आपण कधीच फेडू शकत नाही, असे प्रतिपादन सहर्षा हॉलच्या व्यवस्थापिका सहर्षा साळवे हिने आपल्या जन्मदिन कार्यक्रमाप्रसंगी केले. अपंग सामाजिक विकास संस्थेचे चेअरमन संजय साळवे आणि सचिव वर्षा गायकवाड यांची कन्या सहर्षा साळवे हिचा वाढदिवस एका अनोख्या पद्धतीने शरणपूर वृद्धाश्रमामध्ये साजरा करण्यात आला. वृद्धाश्रमाची गरज ओळखता त्या दृष्टीने आर्थिक सहयोग देण्यात आला. दिव्यांगांची सेवा निस्वार्थीपणे करण्याचे कार्य संजय साळवे व वर्षा साळवे या नित्यनियमाने करत आहे. त्याचबरोबर शरणपूर वृद्धाश्रमाला देखील त्यांचं महत्त्वाचे योगदान नेहमीच असतं. भविष्यात शरणपूर वृद्धाश्रम वृद्धिंगत करण्यासाठी विविध संकल्पना त्यांनी मांडली आहे. त्या पूर्णत्वास नेण्यासाठी अभिवचन देखील त्यांनी दिले आहे. त्याबद्दल शरणपूर वृद्धाश्रमा तर्फे आम्ही त्यांचे धन्यवाद व्यक्त करतो, असे प्रतिपादन शरणपूर वृद्धाश्रमाचे संचालक रावसाहेब मगर यांनी याप्रसंगी केले.

# कांद्याला मिळाला सर्वाधिक भाव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता** : मंगळवारी राहाता बाजार समिती कांद्याला प्रतिक्विंटलला सर्वाधिक १२५० रुपये भाव मिळाला. कांद्याची मंगळवारी राहाता बाजार समिती ४७९४ गोण्यांचीची आवक झाली. कांदा नंबर एकला ९५० ते १२५० रुपये प्रति क्विंटल भाव मिळाला. कांदा नंबर दोन ला ६५० ते ८५० रूपये भाव मिळाला. कांदा नंबर ३ ला ३०० ते ६०० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांदा ४०० ते ७०० रुपये. जोड कांदा १०० ते २५० रुपये प्रति क्विंटलला भाव मिळाला. मंगळवारी डाळिंबाच्या २० क्रेट्सची आवक झाली. डाळिंब नंबर १ ला ९१ रुपये ते २५ रुपये प्रतिकिलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर २ ला ५६ ते ९० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला २६ रुपये ते ५५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ४ ला १० ते २५ रुपये प्रति किलो असा भाव मिळाला, अशी माहिती बाजार समितीचे सभापती ज्ञानेश्वर गोंदकर व सचिव सुभाष मोटे यांनी दिली.



# मिरीत पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च



**जनता आवाज वृत्तसेवा**

**मिरी** : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पाथर्डी पोलिसांनी तालुक्यातील मिरी, करंजी व तिसगाव परिसरात फ्लॅग मार्च (रूट मार्च) काढून सज्जतेचा संदेश दिला. या संचलनाचे नेतृत्व पाथर्डी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी केले. पोलीस उपनिरीक्षक विलास जाधव व निवृत्ती आगरकर यांच्यासह पाथर्डी पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

तसेच राज्य राखीव पोलीस दलाची सशस्त्र तुकडी आणि केंद्रीय राखीव पोलीस दलाची एक तुकडीही या रूट मार्चमध्ये सहभागी झाल्याने परिसरात पोलिसांचा बंदोबस्त दिसून आला. दरम्यान, कडक सकाळच्या सुमारास अचानक मोठा पोलीस फोर्स फाटा पोलीस वाहनांसह मिरी येथे दाखल झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये काही काळ उलट-सुलट चर्चांना उधाण आले. सुरुवातीला परिसरात एखादी गंभीर घटना घडल्याची चर्चा रंगली होती.

# भाळवणी शाळेचे परीक्षांमध्ये यश



**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर** : जिल्हा परिषदेच्या भाळवणी प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली च्या विद्यार्थ्यांनी एन. एस. ई., लक्ष्यवेध आणि मंथन या राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. लक्षवेध प्रज्ञाशोध परीक्षेत विद्यार्थी आयुष अरुण रोहोकले याने १५० पैकी १४२ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत ५ वा क्रमांक पटकावला. मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत आयुष अरुण रोहोकले याने १५० पैकी १४४ गुण मिळवत राज्य गुणवत्ता यादीत ४ था क्रमांक पटकावला . एन एस ई परीक्षेत आयुष अरुण रोहोकले याने २०० पैकी १८२ गुण मिळवून राज्यात ४ था क्रमांक मिळवला.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे शिक्षण संचालक दिनकर टेमकर, शिक्षण सहसंचालक रमाकांत काटमोरे, सहसंचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा रमेश कासार, जिल्हा शिक्षणाधिकारी बाळासाहेब बुगे, रयत शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य, ज्ञानदेवराव पांडूळे, कायझेन अ‍ॅकॅडमीचे संचालक डाळींबकर, गटशिक्षणाधिकारी पवार, विस्तार अधिकारी चांगदेव गवळी, कांतीलाल ढवळे, केंद्रप्रमुख उत्तम फंड, मुख्याध्यापक श्रीपती आबुज व सर्व शिक्षक यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# संपूर्ण जगात मानवता हीच एक जात

## हभप संजय महाराज; एकादशीनिमित्त साई मंदिरात कीर्तन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिर्डी** : संपूर्ण जगात मानवता हीच एक जात असून 'सबका मालिक एक' हा साईबाबांचा संदेश आज विश्वाला अनुभूती देत आहे. वारकरी संप्रदायाचा 'राम कृष्ण हरी' हा जसा मंत्र आहे, तसाच जगाला तारणारा 'श्रद्धा-सबुरी'चा मंत्र साईबाबांनी दिला आहे, असे मत प्रसिद्ध कीर्तनकार हभप संजय महाराज जगताप (भऊरकर) यांनी व्यक्त केले. शिर्डी येथील साई मंदिरात वरुथिनी एकादशीनिमित्त आयोजित कीर्तनात ते बोलत होते. कीर्तनादरम्यान महाराजांनी संत तुकाराम महाराजांच्या संतांचा महिमा तो बहु दुर्गम या अभंगावर निरूपण केले. संतांचा महिमा शब्दांत सांगणे कठीण असून केवळ कोरड्या बडबडीने त्यांची थोरवी कळणार नाही.

ज्याप्रमाणे भरपूर दूध देणारी गाय किंवा म्हैस कामधेनू होऊ शकत नाही, त्याचप्रमाणेस आपण स्वतः संतत्व अंगी बाणवले तरच संतांचे मोठेपण समजू शकते, असे त्यांनी स्पष्ट केले. जीवनात यशस्वी आणि आत्मिक समाधानी व्हायचे असेल तर भगवंताचे नामस्मरण करणे आवश्यक आहे. नामचिंतनामुळेच हा भवसागर तरुण जाता येतो. शिर्डी ही महान संतांची आणि भगवंताची पावन भूमी आहे. ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीतून जगाला ज्ञान दिले, तसेच साईबाबांच्या सत्चरित्रातून जनसामान्यांना मोठे ज्ञान मिळत असल्याचे हभप जगताप म्हणाले. महाराजांनी साईबाबांच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. संत गंगागीर महाराजांनी प्रथम भेटीतच बाबांमधील महारत्न ओळखून शिर्डीकरांना संदेश दिला होता.

जगात पदे मिळवता येतात, मात्र संत-महंत ही पदे केवळ ईश्वरभक्ती आणि नामस्मरणानेच प्राप्त होतात. साईबाबांनी शिर्डीत रामनवमी, शिवरात्री आणि गोकुळाष्टमी यांसारखे उत्सव सुरू करून भक्तांना ईश्वराच्या उपासनेला लावले. दासगणू महाराजांना पांडुरंगाच्या रूपात दर्शन देणारे साईबाबा हे केवळ संत नसून भगवंताचे अवतार आहेत, याची प्रचिती आज जगाला येत आहे, असे त्यांनी नमूद केले.

### सत्काराप्रसंगी यांची होती उपस्थिती

साई संस्थानच्या मंदिर विभागाच्या वतीने हभप संजय महाराज जगताप यांचा पुष्पहार व शाल देऊन सन्मान करण्यात आला. भाविकांच्या वतीने सचिन घोडेकर, सुनील जपे आणि पत्रकार राजेंद्र गडकरी यांनीही त्यांचा सत्कार केला. कार्यक्रमास ज्ञानेश्वर मंदिर परमहंस आश्रमातील टाळकरी, भजनी मंडळ, चोपदार नवनाथ थोरे, देशमुख यांच्यासह वारकरी आणि साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जनतेची कामे पारदर्शक व तत्परतेने करा

## नगराध्यक्ष डॉ. स्वाधिन गाडेकर; नागरी सेवा दिनानिमित्त कर्मचाऱ्यांचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहाता :** स्वातंत्र्यानंतर सरदार पटेल यांनी नागरी सेवकांना दिलेल्या मार्गदर्शनाची आठवण कायम राहावी, यासाठी नागरी सेवा दिन साजरा केला जातो. पालिकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनतेची कामे तत्परतेने व पारदर्शकपणे करावीत, तसेच त्यांना प्रेरणा मिळावी हा उद्देश आहे, असे प्रतिपादन नगराध्यक्ष डॉ. स्वाधिन गाडेकर यांनी केले.




पोलादी पुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या स्मृतीप्रित्यर्थ साजऱ्या करण्यात येणाऱ्या नागरी सेवा दिनानिमित्त राहाता नगरपालिकेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी पालिकेतील मुख्याधिकारी तसेच विविध विभागांतील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमात मुख्याधिकारी वैभव लोंढे यांच्यासह विविध खातेप्रमुखांचा पालिकेच्या वतीने सत्कार करण्यात आला. उपनगराध्यक्ष डॉ. विजय सदाफळ, गटनेते मुन्ना शाह यांच्यासह नगरसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. गाडेकर यांनी पुढे सांगितले की, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच भाजपचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील यांच्या सूचनेनुसार या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### कार्यक्रमास यांची होती उपस्थिती

बांधकाम सभापती अजय आग्रे, पाणीपुरवठा सभापती नितीन गाडेकर, स्वच्छता व आरोग्य सभापती अर्चना निकाळे, महिला व बालकल्याण सभापती अनिता शेळके, तसेच नगरसेवक राहुल सदाफळ, दशरथ तुपे, सविता सदाफळ, ॲड. मयुर पाळंदे, प्रविण रुणवाल, अक्षय बोठे, विजय गिधाड, साहेबराव निधाने, मनिष चितळकर आदी मान्यवर उपस्थित होते.

---

# गोविंद आसावाने मिळविले ५ सुवर्णपदके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील रयत शिक्षण संस्थेच्या बापूजी सहादू कडू पाटील विद्यालयाचा माजी विद्यार्थी ॲड. गोविंद आसावा याने प्रतिकूल परिस्थितीवर मात करत गुजरात नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीमध्ये पाच सुवर्णपदके मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. भारताचे सरन्यायाधीश यांच्या हस्ते झालेल्या सन्मानामुळे त्यांच्या यशाची दखल राष्ट्रीय स्तरावर घेतली गेली आहे.




शेतकरी कुटुंबात वाढलेल्या आसावा यांचा शैक्षणिक प्रवास अनेक अडचणींनी भरलेला होता. वडिलांच्या आकस्मिक निधनानंतर कुटुंबावर आलेल्या आर्थिक संकटाचा सामना करत त्यांनी शिक्षणात सातत्य राखले. प्रतिकूल परिस्थितीला न जुमानता जिद्द, परिश्रम आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर त्यांनी आपले ध्येय साध्य केले.

सन २०१९-२० मध्ये बापूजी कडू पाटील विद्यालयातून शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अहमदाबाद व गांधीनगर येथे विधी शिक्षण घेतले. शिक्षणाच्या प्रत्येक टप्प्यावर गुणवत्तेची परंपरा जपत त्यांनी पाच सुवर्णपदके पटकावली. त्यांच्या या यशामुळे गावासह शैक्षणिक संस्थेचा लौकिक वाढला आहे.

> आसावा यांनी सातत्यपूर्ण अभ्यास, वाचनाची सवय आणि चालू घडामोडींचे भान यांचे महत्त्व अधोरेखित केले. वर्तमानपत्र वाचनामुळे विचारक्षमता विकसित होते आणि स्पर्धा परीक्षांमध्ये त्याचा उपयोग होतो. आसावा यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा देत अशा यशस्वी उदाहरणांमधून मार्गक्रमण करावे. समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवत पुढे जाणे आवश्यक आहे.
>
> – अरुण कडू पाटील

---

# डॉ. कलाम्स व्हिजन अकॅडमीचे जेईईमध्ये सुयश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोल्हार :** राहाता परिसरातील डॉ. कलाम्स व्हिजन अकॅडमीने जेईई परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शिक्षण क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. अकॅडमीच्या पहिल्याच बॅचमधील एकूण ५० विद्यार्थ्यांपैकी ४ विद्यार्थ्यांनी जेईई ॲडव्हान्ससाठी पात्रता मिळवली असून हा अकॅडमीसाठी अभिमानाचा क्षण ठरला आहे.

रोजमीन शेख (९५.३४ टक्के), ओमराज विखे (८६.६६ टक्के), नील सोमवंशी (८५.९३ टक्के) आणि सिध्दी घोगरे (८५.८६ टक्के) या विद्यार्थ्यांनी दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण परिश्रमातून ही यशस्वी झेप घेतली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे पंचक्रोशीत आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून स्पर्धा परीक्षांविषयी विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.



### कलाम्स व्हिजनमुळे विद्यार्थ्यांना दिलासा

अकॅडमीच्या अध्यक्षा स्वाती खर्डे यांनी ग्रामीण भागात जेईई व नीटसारख्या स्पर्धा परीक्षांच्या तयारीचा पाया रोवला आहे. त्यांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन महागड्या कोचिंगचा पर्याय शोधण्याची गरज उरलेली नाही, ही बाब पालक व विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक ठरत आहे.

अकॅडमीच्या पहिल्याच बॅचचा इतका उज्ज्वल निकाल लागल्याने पालकवर्गाने समाधान व्यक्त करत संस्थेचे विशेष कौतुक केले. विद्यार्थ्यांच्या यशानिमित्त विजयी मिरवणूक काढून अभिनंदन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. या यशामागे अकॅडमीच्या विषयतज्ज्ञ शिक्षकांचे मोलाचे योगदान आहे. गणितासाठी सोनू कुमार, रसायनशास्त्रासाठी अमित ठाकूर आणि भौतिकशास्त्रासाठी विरेंद्र राठोड यांनी विद्यार्थ्यांना अचूक व परिणामकारक मार्गदर्शन केले.

या यशामुळे डॉ. कलाम्स व्हिजन अकॅडमीने शिक्षण क्षेत्रात नवा आदर्श निर्माण केला आहे.

---

# खर्ड्याचा दबंग वारसा शिक्षणातही चमकला

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** नुकत्याच जाहीर झालेल्या सिबीएससी बोर्डाच्या दहावीच्या परीक्षेत जामखेड येथील कालिका पोदार लर्न स्कूलचा विद्यार्थी चि. शर्विल विजय झंजाड याने ९०.४० टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या दमदार कामगिरीमुळे शर्विलने जामखेड तालुक्यात अव्वल स्थान पटकावले असून सर्वत्र त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



शर्विल हा खर्डा पोलीस स्टेशन परिसरात दबंग कार्यशैलीसाठी ओळखले जाणारे तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय झंजाड यांचा सुपुत्र आहे. विजय झंजाड यांनी खर्डा येथे कार्यरत असताना गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण ठेवत सर्वसामान्यांना मोठा दिलासा दिला होता. त्यांचा कष्ट, शिस्त आणि जिद्दीचा वारसा शर्विलने शिक्षणातही तितक्याच दमदारपणे पुढे नेला आहे.

कालिका पोदार लर्न स्कूलने यंदाही उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम राखली आहे. शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची सातत्यपूर्ण मेहनत आणि अभ्यासातील एकाग्रता यामुळेच हे यश शक्य झाल्याचे मत व्यक्त होत आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन घेत असलेल्या प्रयत्नांचे हे फलित असल्याचेही स्पष्ट झाले आहे.

शर्विलचे हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणार असून, ग्रामस्थांसह विविध स्तरांतून त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

# तुकाईवस्ती शाळेच्या विद्यार्थ्यांनी मिळवले राज्यस्तरीय मानांकन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** जिल्हा परिषदेच्या निघोज येथील तुकाई वस्ती प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी लक्षवेध, एमएसई, मंथन व ऑलिम्पियाड या शैक्षणिक स्पर्धांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश संपादन केले आहे. या यशामुळे शाळेचे व परिसराचे नाव राज्यभर उज्ज्वल झाले असून सर्व स्तरातून विद्यार्थ्यांवर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

इयत्ता पहिलीतील देवांशी गणेश कवाद हिने उत्कृष्ट कामगिरी करत लक्षवेध स्पर्धेत १४६ गुण मिळवत राज्यात तिसरा क्रमांक पटकावला. तसेच एनएसईमध्ये १७८ गुणांसह सहावा, मंथनमध्ये १३० गुणांसह अकरावा क्रमांक मिळवला, तर ऑलिम्पियाडमध्ये १८४ गुण मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली.



त्याचप्रमाणे अर्नव आदिनाथ कवाद (इ. १ ली) याने लक्षवेध स्पर्धेत १२८ गुणांसह राज्यात बारावा क्रमांक मिळवला. युवराज हरिष वराळ (इ. १ ली) याने लक्षवेधमध्ये १३८ गुणांसह सोळावा, तर एनएसईमध्ये १४२ गुणांसह सोळावा क्रमांक पटकावला.

इयत्ता दुसरीतील परी नामदेव लंके हिने एनएसई स्पर्धेत १८० गुण मिळवत राज्यात अकरावा क्रमांक मिळवला. तसेच रुद्र नितीन कवाद (इ. १ ली) याने लक्षवेधमध्ये ११८ गुणांसह सतरावा, तर सिया सुधाकर कवाद हिने ११६ गुणांसह अठरावा क्रमांक मिळवला.

या सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षिका शिंदे व शिर्के यांचे विशेष कौतुक होत आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल खासदार डॉ. निलेश लंके, मळगंगा ग्रामीण ट्रस्टचे कार्याध्यक्ष वसंतराव कवाद, माजी सरपंच ठकाराम लंके, तुकाई माता विकास ट्रस्टचे अध्यक्ष भिमाजी घुले यांच्यासह विविध मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्येही मोठी गुणवत्ता असून योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते राज्यस्तरावरही झळकू शकतात, हे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे.

---

# घोडेगावात मटका जुगारावर पोलिसांचा छापा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** नेवासा तालुक्यातील घोडेगाव परिसरात मटका जुगार खेळला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर सोनई पोलिसांनी तात्काळ छापा टाकून एकाला अटक केली. ही कारवाई दि. २१ एप्रिल रोजी सायंकाळी सुमारे ६.०५ वाजण्याच्या सुमारास घोडेगाव बसस्टँड शेजारी असलेल्या एका पत्र्याच्या टपरीच्या आडोशाला करण्यात आली.

या कारवाईत पोलिसांनी फिरोज मुसाबाई शेख (वय ४५, रा. घोडेगाव, ता. नेवासा) याला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ११५० रुपयांची रोख रक्कम, विविध दराच्या चलनी नोटा तसेच मटका जुगार खेळण्यासाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे.



या प्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस कर्मचारी सोमनाथ आसाराम झांबरे यांनी फिर्याद दिली आहे.

सदर कारवाई सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी बी. एम. तागड यांनी केली प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक फौजदार अडकिते करत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे परिसरात अवैध जुगार व्यवसायावर आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त जात केली आहे.

---

# आश्वी परिसरात चोरट्यांचा धुमाकूळ

## कोंचीतून ५० हजारांची रोकड लंपास; नागरिकांत दहशतीचे वातावरण

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील आश्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत चोरट्यांनी धुमाकूळ घातला असून, पोलिसांच्या कार्यक्षमतेवर मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. शनिवारी उंबरी बाळापूर आणि आश्वी बुद्रुक येथे चोरीच्या घटना ताज्या असतानाच, रविवारी मध्यरात्री चोरट्यांनी कोंची शिवारात धाडसी चोरी करत ५० ते ५५ हजार रुपयांची रोकड लंपास केली. सततच्या या चोऱ्यांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कोंची शिवारातील गिरी वस्ती येथे अमोल मोहन गिरी हे आपल्या कुटुंबासह राहतात. रविवारी रात्री उकाडा असल्याने अमोल गिरी हे घराबाहेर झोपले होते. हीच संधी साधून सोमवारी पहाटेच्या सुमारास चोरट्यांनी घरात प्रवेश केला. कपाटातील सामानाची उचकापाचक करून चोरट्यांनी ५० ते ५५ हजार रुपयांची रोकड आणि घरातील महत्त्वाची कागदपत्रे चोरून नेली.

केवळ गिरी यांच्याच घरी नव्हे, तर चोरट्यांनी परिसरातील इतर एक-दोन घरांमध्येही चोरीचा प्रयत्न केला. मात्र, काही नागरिकांना जाग आल्याचे लक्षात येताच चोरट्यांनी तिथून पळ काढला. विशेष म्हणजे, या चोरीबाबत अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार पोलीस ठाण्यात दाखल झालेली नाही, मात्र घटनेमुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट आहे.

### पोलिसांच्या कामगिरीवर नागरिकांनी नाराजी

पोलिसांच्या गस्तीच्या वेळेबाबत आता लोकांमध्ये कुजबुज सुरू झाली आहे. चोऱ्यांचे सत्र सुरू असताना पोलिसांची गस्त नेमकी कुठे असते? असा प्रश्न विचारला जात आहे. जुन्या चोऱ्यांचा तपास अद्याप लागलेला नसताना नवीन घटना घडत असल्याने आश्वी पोलिसांच्या तपासाच्या गतीवर नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

दोनच दिवसांपूर्वी उंबरी बाळापूर आणि आश्वी परिसरात चोरट्यांनी धुमाकूळ घातला होता. यावेळी एका वृद्ध महिलेला मारहाण करून जखमी करत सोन्याचे दागिने आणि रोकड लंपास केली होती. ही घटना ताजी असतानाच आता कोंची येथे चोरी झाल्याने चोरट्यांनी पोलिसांना उघड आव्हान दिल्याचे दिसून येत आहे. हकेच्या अंतरावर चोऱ्या होत असताना पोलीस काय करत आहेत? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

परिसरात चोरांचा सुळसुळाट झाल्याने नागरिकांमध्ये कमालीची घबराट पसरली आहे. संध्याकाळ होताच घरांचे दरवाजे बंद केले जात आहेत. शेतात किंवा कामावर गेलेल्या पुरुषांना घरून "लवकर घरी या" असे फोन येऊ लागले आहेत. घरातील महिला आणि मुलांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

---

# शेडगावमध्ये रामभाऊ जांभळेंचा सन्मान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा :** नूतन मराठी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेडगाव येथून सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या ज्येष्ठ शिक्षक रामभाऊ जांभळे यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य सूर्यवंशी सर होते. आपल्या दीर्घ सेवाकाळात जांभळे सरांनी वाक्यातशीरपणा, शिस्त, प्रामाणिकपणा आणि कामाप्रती निष्ठा या मूल्यांचे सातत्याने पालन केले. त्यांच्या या गुणांमुळे त्यांनी विद्यार्थी, सहकारी आणि ग्रामस्थांमध्ये विशेष आदराचे स्थान निर्माण केले.

समारंभात शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी जांभळे सरांविषयी आपल्या भावना व्यक्त करत त्यांच्या कार्याचा गौरव केला. तसेच ग्रामस्थांनीही त्यांच्या सेवेबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. शाळेच्या उभारणीपासून ते विकासापर्यंत जांभळे सरांचे योगदान मोलाचे असल्याचे यावेळी सर्वांनी अधोरेखित केले.

याप्रसंगी लक्ष्मण रसाळ, भीमराव बेलेकर, किसन बेलेकर, विजय रसाळ, शाहूराज भोपळे, देविदास रसाळ, आप्पासाहेब भोसले, मोहन शेळके, अजित शेळके, चैत्राली शेळके, तुकाई देवी ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र शेळके, शंकर मांडगे, भगवान चव्हाण, आशा चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते. यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

---

# विद्या मोटेंना विधानपरिषदेवर संधी द्या

## धनगर समाज बांधवांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** शिवसेना नेत्या ॲड. विद्याताई मोटे यांची शिवसेना पक्षाने विधान परिषदेवर संधी द्यावी, यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगाव चौंडी येथे अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर बांधवांच्या वतीने अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करुन शिवसेना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना अहिल्यानगर जिल्ह्यातील धनगर समाजाच्या वतीने मागणी करण्यात आली.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंतीचे औचित्य साधत अहिल्याकन्या विद्याताई मोटे यांना शिंदे गटाकडुन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व शिवसेना पक्षाने विधान परिषदेवर संधी द्यावी, अशी मागणी समस्त धनगर समाज बांधव अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मगाव आसलेल्या चौंडी येथे दि २० एप्रिल २०२६ रोजी अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्ध अभिषेक करुन करण्यात आली.

यावेळी महाराजा यशवंतराव होळकर राज्याभिषेक सोहळा समितीचे सदस्य पांडुरंग माने यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, विद्याताई मोटे यांच्या मागिल कार्यकाळात जे मोठे समाजकार्य करण्यात आले त्याची दखल घेत धनगर समाज बांधव त्यांच्या पाठीशी उभा आहे. शिवसेना उपमुख्यमंत्री राज्य एकनाथ शिंदे यांनी अहिल्याकन्या विद्याताई मोटे यांना विधान परिषदेवर संधी देऊन समस्त धनगर बांधवांच्या मनावरती राज्य करावे.

तसेच शिवसेनेच्या कोट्यातून उच्चशिक्षित मोटे विधानपरिषद गेल्यास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा महाराष्ट्रातील धनगर बांधवांच्या वतीने चोंडी येथे ३१ मे रोजी येतोचित भावी दिव्य अशा सत्कार करण्यात येईल. पहिली महिला धनगर समाजातील विधान परिषदेवरती जाणे हा महाराष्ट्रातील तमाम धनगर बांधवांसाठी आनंदाचा क्षण असेल.

३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंतीचे औचित्य साधत एकनाथ शिंदे हे उच्च शिक्षित धनगर समाजाच्या महिलेला विधान परिषदेवरती नक्कीच संधी देतील आणि आमच्या अहिल्या चरणी नतमस्तक होऊन केलेल्या मागणीला नक्कीच यश द्याल असे देखील पांडुरंग माने यांनी सांगितले. चौंडी येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेस दुग्धअभिषेक करण्यात आला.

### मोटेंचे नाव आघाडीवर असल्याची चर्चा

विद्याताई मोटे या गेल्या काही वर्षात सामाजिक व राजकीय पातळीवर सक्रिय राहिल्या आहेत, विशेषतः धनगर समाजातील प्रश्न, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक पातळीवरील संघटनात्मक कामांमुळे त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांनी तळागाळाशी थेट संपर्क आणि संघटन कौशल्यामुळे शिवसेनेतील एक प्रभावी महिला चेहरा म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यामुळेच विधानपरिषदेच्या संभाव्य उमेदवारांच्या यादीत त्यांचे नाव आधाडीवर असल्याचे बोलले जात आहे.

---

# पेमाईदेवीची खताळ दांपत्यांकडून आरती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील शिवसंकल्प भूमी पेमगिरी येथे पेमाईदेवी मातेच्या यात्रोत्सवानिमित्त आमदार अमोल खताळ व त्यांच्या पत्नी नीलम खताळ यांच्या हस्ते विधीवत महापूजा व महाआरती संपन्न झाली. यानंतर त्यांनी देवीचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतला.

यात्रोत्सवाच्या निमित्ताने गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. आमदार खताळ दांपत्यांनी मंदिरात उपस्थित राहून पेमाईदेवी मातेची पूजा-अर्चा केली. महाआरतीनंतर त्यांनी परिसरातील नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व समस्या जाणून घेतल्या.



दरम्यान, यात्रेनिमित्त गावातून पारंपरिक वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत आमदार खताळ यांनी सपत्नीक सहभाग घेत उत्साहात भर घातली. मंदिर परिसर आकर्षक सजावटीने उजळून निघाला होता. भाविकांसाठी विविध सोयी-सुविधांचीही व्यवस्था करण्यात आली होती.स्थानिक ग्रामस्थ व मंदिर समितीच्या वतीने यात्रेचे नियोजन सुयोग्य पद्धतीने करण्यात आले. या कार्यक्रमाला स्थानिक पदाधिकारी, ग्रामस्थ, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पेमाईदेवी मातेच्या जयघोषात आणि भक्तिमय वातावरणात यात्रोत्सव उत्साहात पार पडला.

# एका नारीने व्यवस्थेला शिकविला लोकशाहीचा धडा

## सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या घटनेत त्या महिलेच्या आवाजात रोष

**महेश रक्ताटे**
**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : रस्त्यावर सुरू असलेल्या रास्ता रोको आंदोलनामुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय पाहून एका सामान्य महिलेने थेट मंत्री आणि पोलीस अधिकाऱ्यांनाच जाब विचारला आणि काही क्षणांसाठी तरी सत्तेची भाषा थांबली. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या या घटनेत त्या महिलेच्या आवाजात रोष होता, पण त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यात नागरिकत्वाची जाणीव होती. ही घटना केवळ एका महिलेची प्रतिक्रिया नाही, तर लोकशाहीच्या मुळाशी असलेल्या 'सामान्य नागरिकाच्या ताकदी'ची आठवण करून देणारी आहे.




आपल्याकडे एक सर्वसाधारण समज पक्का झाला आहे समाजात बदल घडवायचा असेल तर आमदार, खासदार, मंत्री किंवा मोठ्या पदावर पोहोचले पाहिजे. पण हा समज वास्तवापेक्षा अधिक सोयीस्कर आहे. कारण पद मिळवणे कठीण असते; मात्र अन्यायाविरोधात आवाज उठवणे हे प्रत्येक नागरिकाच्या हातात असते. त्या महिलेने कोणतेही पद नसताना व्यवस्थेला थेट प्रश्न विचारून हेच दाखवून दिले.

लोकशाहीत सत्ता ही निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडे असते, पण नैतिक अधिकार हा नागरिकांकडे असतो. रस्त्यावर उभा असलेला नागरिक जर प्रश्न विचारू लागला, तर प्रशासनाला उत्तर द्यावेच लागते. व्यवस्थेतील अनेक त्रुटी या नागरिकांच्या शांततेमुळे टिकून राहतात. अन्याय डोळ्यादेखत दिसत असताना आपण गप्प बसतो. ''कशाला उगाच वाद घालायचा'', ''आपल्याला काय करायचे आहे'' अशी मानसिकता समाजात रुजली आहे. हीच मानसिकता व्यवस्थेला निष्क्रिय बनवते.

शिक्षण घेताना आपण संविधान, नागरिकांचे हक्क, कर्तव्ये याबद्दल शिकतो. परंतु प्रत्यक्ष जीवनात मात्र आपणच मागे हटतो. चुकीच्या गोष्टींना विरोध करण्याऐवजी आपण तडजोड करतो. कुणाला दुखावू नये म्हणून आपण मौन बाळगतो. ही 'डबल ढोलकी' भूमिका समाजाच्या प्रगतीसाठी घातक ठरते. चांगल्या गोष्टींसाठी आवाज उठवणे म्हणजे वाद घालणे नव्हे, तर लोकशाही मजबूत करणे होय.

महिलांच्या सक्षमीकरणाबाबतही अशीच परिस्थिती दिसते. आरक्षण देऊन महिलांना पदे मिळू शकतात; पण धैर्य, आत्मविश्वास आणि सामाजिक जबाबदारी ही वेगळी गोष्ट आहे. अनेकदा पदे मिळाल्यानंतरही अपेक्षित बदल दिसत नाहीत. त्यामुळे महिलांमध्ये आणि एकूणच समाजात लढण्याची मानसिकता विकसित करणे आवश्यक आहे. निर्णयक्षमता, प्रश्न विचारण्याची सवय आणि अन्यायाविरोधात उभे राहण्याचे धैर्य हेच खरे सक्षमीकरण आहे.

त्या महिलेने दाखवलेली भूमिका म्हणजे व्यवस्थेला दिलेला एक छोटा पण प्रभावी धक्का आहे. अशा घटना अपवाद न राहता प्रवाह बनल्या, तर समाजात बदल घडणे अपरिहार्य ठरेल. प्रत्येक नागरिकाने आपला आवाज महत्त्वाचा आहे, ही जाणीव ठेवली पाहिजे. कारण लोकशाही केवळ मतदानापुरती मर्यादित नसते; ती सतत जागरूक राहण्याची प्रक्रिया असते.

पद, सत्ता किंवा अधिकार यापेक्षा मोठी गोष्ट म्हणजे नागरिकांचे धैर्य. अशी हिंमत प्रत्येकामध्ये निर्माण झाली, तर व्यवस्थाही अधिक जबाबदार बनेल आणि देश खऱ्या अर्थाने समृद्धीकडे वाटचाल करेल.

# उन्हाळी सुट्टीत 'पुस्तके ऐका-निबंध लिहा' स्पर्धा

**जनता आवाज वृत्तसेवा**




**अहिल्यानगर** : मोबाईलच्या वाढत्या वापरामुळे पुस्तकांपासून दूर जात असलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा वाचनाची गोडी लागावी या उद्देशाने ज्ञानकौशल्य ट्रस्ट आणि श्रोता ऑडिओ बुक ॲप यांच्या संयुक्त विद्यमाने उन्हाळी सुट्टीत 'पुस्तके ऐका-निबंध लिहा-बक्षीस जिंका' या राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. इयत्ता पहिली ते नववीपर्यंतच्या मराठी भाषिक विद्यार्थ्यांसाठी ही स्पर्धा खुली असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष तथा लेखक सचिन मोहन चोभे यांनी दिली.

साहित्य-संस्कृतीच्या विश्वात वाचकांची संख्या घटत असल्याची चिंता व्यक्त होत असताना, 'श्रोता' ऑडिओ बुक ॲपच्या माध्यमातून बोलकी पुस्तके मोफत उपलब्ध करून देण्याचा उपक्रम राबविण्यात आला आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या साहाय्याने तयार करण्यात आलेल्या या ऑडिओ पुस्तकांना साहित्यप्रेमींकडून चांगला प्रतिसाद मिळत असला, तरी बालवाचकांचा सहभाग तुलनेने कमी असल्याचे दिसून येते. हा प्रतिसाद वाढावा आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनासोबत लेखनाचीही आवड निर्माण व्हावी, या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आल्याचे चोभे यांनी सांगितले.

महाराष्ट्रासह देश-विदेशातील कोणताही विद्यार्थी या स्पर्धेत सहभागी होऊ शकतो. श्रोता ऑडिओ बुक ॲपवरील 'किड्स कॉर्नर' या विभागातील कथा, कविता आणि कादंबऱ्यांवर आधारित दीर्घोत्तरी प्रश्नोत्तरे व निबंधलेखन असे स्पर्धेचे स्वरूप असेल. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले नाव, इयत्ता, संपूर्ण पत्ता, पालकांचा मोबाईल क्रमांक, ईमेल आणि शाळेचे नाव-पत्ता ही माहिती ४ जून २०२६ पूर्वी . या ईमेलवर किंवा ८८३०११३५२८ या व्हॉट्सॲप क्रमांकावर पाठवावी.

५ जून २०२६ रोजी सर्व नोंदणीकृत विद्यार्थ्यांना ईमेल व व्हॉट्सॲपद्वारे प्रश्नपत्रिका पीडीएफ स्वरूपात पाठविण्यात येईल. विद्यार्थ्यांनी प्रश्नोत्तरे व निबंध स्वहस्ताक्षरात लिहून २० जून २०२६ पूर्वी पोस्ट किंवा कुरिअरद्वारे संस्थेकडे पाठवावेत. ईमेल किंवा व्हॉट्सॲपद्वारे पाठविलेल्या उत्तरपत्रिका ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

# खर्डा येथे मध्यरात्री भीषण आग

## गाईचा गोठा जळून खाक, शेतकरी लोखंडे बंधूंचे मोठे नुकसान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**खर्डा** : येथील चांभारवाडा परिसरात मध्यरात्रीच्या सुमारास लागलेल्या भीषण आगीत गाईचा गोठा पूर्णपणे जळून खाक झाल्याची धक्कादायक घटना घडली. या आगीत शेतकरी गोरख दत्तात्रय लोखंडे व सुरेश लोखंडे यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून एका बैलाला गंभीर दुखापत झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्यरात्री अचानक गोठ्यात आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत आग विझविण्याचा प्रयत्न केला. मात्र आग वेगाने पसरल्याने काही क्षणातच संपूर्ण गोठा आगीत भस्मसात झाला. या आगीत गोठ्यातील सर्व साहित्य जळून खाक झाले.

या घटनेत गोठ्यात बांधलेला एक बैल गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर उपचार सुरू आहेत. तसेच गोठ्याजवळ उभी असलेली मोटारसायकल आणि इतर शेतीसाठी वापरण्यात येणारे साहित्य देखील आगीत जळून नष्ट झाले. जनावरांसाठी साठवून ठेवलेले खाद्य, चारा आणि इतर आवश्यक सामग्री पूर्णपणे जळाल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.



आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून प्राथमिक अंदाजानुसार शॉर्टसर्किट किंवा इतर कारणामुळे आग लागल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त होत असून शेतकरी कुटुंबावर मोठे संकट ओढवले आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी संबंधित प्रशासनाला कळविले असून पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. तसेच शासनाने तातडीने आर्थिक मदत देऊन बाधित शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.

या भीषण आगीत शेतकऱ्यांच्या उपजीविकेचे साधनच नष्ट झाल्याने चांभारवाडा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# शेतकरी कर्जमाफीला गती

## उच्चाधिकार समितीचा अहवाल सरकारकडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई** : राज्यातील शेतकरी कर्जमाफीबाबत महत्त्वाची घडामोड समोर आली असून प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीने आपला अहवाल राज्य सरकारकडे सादर केला आहे. हा अहवाल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आला असून छाननीनंतर मंत्रिमंडळासमोर मंजुरीसाठी ठेवला जाणार असल्याने कर्जमाफीचा निर्णय लवकरच होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

राज्यातील शेतकऱ्यांची थकीत कर्जातून सुटका करून त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी विविध उपाययोजना या अहवालात सुचविण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. त्यामुळे कर्जमाफीच्या अटी, निकष आणि शिफारसी काय असतील याकडे राज्यातील शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, कर्जमाफीबाबत सुरू असलेल्या चर्चांदरम्यान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरीप हंगाम सुरू होण्यापूर्वी शेतकरी कर्जमाफी लागू करण्याची घोषणा केली होती. राहुरी येथील प्रचार सभेत बोलताना त्यांनी समितीचा अहवाल प्राप्त झाल्याचे सांगत,



कर्जमाफी प्रत्यक्षात आणण्याची प्रक्रिया सुरू असल्याचे स्पष्ट केले. तसेच प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचेही नुकसान होऊ नये म्हणून त्यांनाही मदत दिली जाईल, असे त्यांनी नमूद केले.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजना' जाहीर केली होती. या योजनेनुसार ३० सप्टेंबरपर्यंत थकित असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे कृषी कर्ज माफ करण्याचा प्रस्ताव आहे. तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या योजनेमुळे राज्याच्या तिजोरीवर सुमारे ३५ हजार कोटी रुपयांचा भार पडण्याची शक्यता आहे.

शेतकऱ्यांची कर्जाच्या विळख्यातून कायमस्वरूपी सुटका करण्यासाठी व्यापक उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने ही उच्चाधिकार समिती स्थापन करण्यात आली होती. समितीत महसूल, वित्त, कृषी, जलसंपदा, सहकार, पणन, माहिती तंत्रज्ञान, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागांसह सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँकांच्या प्रतिनिधींचा समावेश होता. समितीने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राष्ट्रीयीकृत बँकांकडून माहिती संकलित करून थकबाकीदार तसेच नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचा अभ्यास करत हा अहवाल तयार केला आहे.

अटी आणि शर्तींबाबत अद्याप स्पष्टता नसली, तरी २०१७ मधील कर्जमाफीच्या धर्तीवरच या योजनेचे निकष असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. दरम्यान, समितीचा अहवाल सादर झाल्याने कर्जमाफीच्या निर्णय प्रक्रियेला गती मिळणार असून खरीप हंगामापूर्वी शेतकऱ्यांना दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# इंटरक्लास तायक्कांदो स्पर्धेत श्लोक बारटक्के द्वितीय

**जनता आवाज वृत्तसेवा**




**अहिल्यानगर** : भिस्तबाग येथील मीरा प्री-स्कूलमध्ये आयोजित इंटरक्लास तायक्कांदो चॅम्पियनशिप २०२६ स्पर्धेत श्लोक अवधूत बारटक्के याने २२ किलो वजन गटात द्वितीय क्रमांक पटकावला. अहिल्यानगर येथील केटायगर्सचे प्रशिक्षक सुरेश वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली श्लोकने ही कामगिरी केली. श्लोक हा अवधूत बारटक्के यांचा मुलगा असून त्याच्या यशाबद्दल विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांचा २७ एप्रिलपासून बेमुदत बंदचा इशारा

## अहिल्यानगर जिल्ह्यातही आंदोलनाला पाठिंबा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर** : राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर कृषी विभागाकडून ठोस निर्णय होत नसल्याच्या निषेधार्थ राज्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांनी २७ एप्रिल २०२६ पासून बेमुदत विक्री केंद्रे बंद ठेवण्याचा इशारा दिला असून या राज्यव्यापी आंदोलनात अहिल्यानगर जिल्हा कृषी निविष्ठा विक्रेता असोसिएशनने सक्रीय सहभाग जाहीर केला आहे.

बियाणे, रासायनिक खते आणि किटकनाशके विक्री व्यवसायातील विविध अडचणींबाबत गेल्या चार ते पाच वर्षांपासून राज्याचे कृषी मंत्री, प्रधान सचिव (कृषी), कृषी आयुक्त तसेच निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येत असल्याचे विक्रेत्यांनी निवेदनात नमूद केले आहे. मात्र, याबाबत अद्याप ठोस निर्णय न झाल्याने विक्रेत्यांमध्ये नाराजी वाढत असल्याचे संघटनेने म्हटले आहे.



कंपन्यांकडून रासायनिक खतांच्या पुरवठ्यात होणारे 'लिंकींग' बंद करणे, शेजारील राज्यांतून येणाऱ्या अप्रमाणित एचटीबीटी कपाशी बियाण्यांवर बंदी, 'साथी' पोर्टलचा वापर उत्पादक व पुरवठादार स्तरावरच राबविणे, रासायनिक खतांचा पुरवठा एफओआर पद्धतीने करणे, विक्री मार्जिनमध्ये वाढ करणे आदी प्रमुख मागण्या विक्रेत्यांनी केल्या आहेत. तसेच सीलबंद पॅकिंगमधील बियाण्यांचे नमुने अपयशी ठरल्यास विक्रेत्यांना आरोपी न ठरविता साक्षीदार म्हणून मान्यता देणे, गुणवत्ता तपासणीतील प्रलंबित रकमा विक्रेत्यांना मिळणे, विक्री केंद्र तपासणीसाठी अधिकाऱ्यांची संख्या वाढविण्याबाबतचा आदेश रद्द करणे, खरीप हंगाम २०२६ साठी युरिया व डीएपी खत वितरणाच्या कार्यपद्धतीचा फेरविचार करणे, मुदतबाह्य किटकनाशके कंपन्यांनी परत घेणे यांसारख्या मागण्याही करण्यात आल्या आहेत.याशिवाय शेजारील राज्यांतून येणाऱ्या अवैध व दुय्यम दर्जाच्या किटकनाशके, तणनाशके, बियाणे व खतांच्या विक्रीवर बंदी घालावी, तसेच केंद्र शासनाच्या नवीन बियाणे कायदा २०२५ मधील विक्रेत्यांसाठीचे जाचक नियम शिथिल करावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# भालगावच्या कासुळे वस्तीत डेंग्यूचा धोका; सहा संशयित रुग्ण आढळले

**जनता आवाज वृत्तसेवा**



**पाथर्डी** : तालुक्यातील भालगाव येथील कासुळे वस्तीत सहा डेंग्यू संशयित रुग्ण आढळून आल्याने आरोग्य विभाग सतर्क झाला आहे. या रुग्णांचे रक्तनमुने पुणे येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. भगवान दराडे यांनी दिली.

सुमारे ४५० लोकसंख्या असलेल्या या वस्तीत आतापर्यंत १० जण तापाने बाधित आढळले असून संशयित रुग्णांवर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. आरोग्य विभागाची तीन पथके घरोघरी तपासणी करत असून परिसरात औषध फवारणी करण्यात आली आहे.

डेंग्यूचा फैलाव रोखण्यासाठी पाणी साठू न देणे आणि परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

# शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिलासा १२ व २४ वर्षांच्या आश्वासित प्रगती योजनेला गती

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीगोंदा** : खाजगी शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित १२ व २४ वर्षांच्या आश्वासित प्रगती योजनेबाबत महत्त्वाची घडामोड घडली असून, उच्च न्यायालय नागपूर खंडपीठाच्या आदेशानुसार शासनाने तातडीने शासन निर्णय निर्गमित करण्याचे निर्देश दिले आहेत. मुंबई मंत्रालयातील वित्त विभागाच्या कक्ष अधिकाऱ्यांनी १३ एप्रिल २०२६ रोजी शालेय शिक्षण विभागाच्या उपसचिवांना याबाबत आदेश दिल्याने या प्रकरणाला गती मिळाली आहे.


राज्य शिक्षकेतर महासंघाच्या वतीने खाजगी शाळांतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे १ ऑक्टोबर २००६ पासून १२ व २४ वर्षांची आश्वासित प्रगती योजना लागू करावी, यासाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही ही योजना १ ऑक्टोबर २००६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू करण्याचे आदेश दिले.

न्यायालयाच्या निकालानंतर राज्य शिक्षकेतर महासंघाचे अध्यक्ष वाल्मीक सुरासे व पदाधिकाऱ्यांनी २७ मार्च २०२६ रोजी मंत्रालयात शासन निर्णय काढण्याची मागणी केली होती. त्यानुसार वित्त विभागाने शालेय शिक्षण व क्रीडा विभागाला तातडीने शासन आदेश निर्गमित करण्याचे निर्देश दिले आहेत. या निर्णयामुळे राज्यातील हजारो शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा १२ व २४ वर्षांच्या प्रगती योजनेचा प्रलंबित मार्ग मोकळा होण्याची शक्यता आहे. तसेच सेवानिवृत्त शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही या निर्णयाचा लाभ मिळणार असून, मागील वेतन फरक आणि पेन्शनमध्ये वाढ होणार आहे.

# चौकार-षटकारांच्या 'अभिषेका'ने दिल्ली नामोहरम

**अंपायर्स कॉल**
**गिरीश कुलकर्णी**

हैदराबादच्या राजीव गांधी मैदानावर दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात झालेल्या सामन्यात हैदराबादचा सलामीवीर अभिषेक शर्मा याने चौकार-षटकारांचा अभिषेक करत दिल्ली संघाला नामोहरम केले. त्याने नाबाद १३५ धावांची धमाकेदार खेळी केल्याने हैदराबादने दिल्लीचा ४७ धावांनी पराभव केला. अभिषेक शर्माचे हे टी-२० चौथे शतक आहे. त्याने विराट कोहली, क्विंटन डिकॉक, रायली रुसो व साहेबजादा फरहान यांची बरोबरी केली आहे. अभिषेकच्या धुवाँधार फलंदाजीमुळे दिल्लीचे गोलंदाज हताश झाले होते. कुठेही आणि कोणताही चेंडू टाकला तरी अभिषेक तो मैदानाच्या बाहेर मारत होता. त्याच्या या आक्रमक फलंदाजीने दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेल हताश झालेला दिसत होता. अर्थात त्याच्यावर हाताश होण्याची वेळ त्यांच्या क्षेत्ररक्षकांनीच आणली होती. केएल राहुलने शर्माला धावचित करण्याची सोपी संधी वाया घालवली, तर नितीश राणाने त्याचा सोपा झेल सोडला. या दोन जीवदानांचा पुरेपूर फायदा घेत शर्माने शतकाला तर गवसणी घातलीच, पण २० षटकात २४२ धावांचा डोंगर उभा करण्यात मोलाचा वाटा उचलला. या सामन्यात अक्षर पटेलचे नेतृत्वही प्रभावहीन दिसले. पार्टटाईम गोलंदाज नितीश राणाला चार षटके गोलंदाजी देण्याचा निर्णय अनाकलनीय होता. त्याच्या चार षटकात तब्बल ५५ धावा फटकावल्या गेल्या. हैदराबादचा हा सलग तिसरा विजय आहे. गुणतालिकेत त्यांनी तिसऱ्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आधीच्या सामन्यातही हैदराबादच्या फलंदाजांनी उत्तम फलंदाजी करून दोनशे प्लस धावा केल्या होत्या. मात्र त्यांची गोलंदाजीची बाजू कमकुवत असल्याने त्यांना काही सामन्यात पराभव पत्करावा लागला. कर्णधार इशान किशनने धाडसी निर्णय घेत अनुभवी जयदेव उडानकट व हर्षल पटेल या दिग्गज गोलंदाजांना बेंचवर बसवत प्रफुल्ल हिंगे, अकिल हुसेन, इशान मलिंगा यांना संधी दिली. त्यांनीही संधीचे सोने करत हैदराबादच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आहे.



दिल्लीचा कर्णधार अक्षर पटेलने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा घेतलेला निर्णय त्यांच्यावर बुमरँग झाला. हैदराबादचे सलामीवीर अभिषेक शर्मा व ट्रॅव्हिस हेड यांनी सुरूवातीपासून आक्रमक फलंदाजी करत दिल्लीच्या गोलंदाजांवर दडपण आणले. या दोघांनी पहिल्या गड्यासाठी ९७ धावांची भागिदारी करून मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. ३७ धावा करून हेड बाद झाल्यानंतर कर्णधार इशान किशनने आल्यापासून फटकेबाजी करण्यास सुरूवात केली. १३ चेंडूत २५ धावांची खेळी करून तो दुदैवीरित्या धावबाद झाला. त्यानंतर दिल्लीला हैदराबादचा एकही फलंदाज बाद करता आला नाही. हेनरिक क्लासेन आणि शर्मा यांनी शेवटच्या २० षटकापर्यंत दिल्लीच्या गोलंदाजांची तुफान धुलाई केली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी ३२ चेंडूत ६६ धावांची नाबाद भागिदारी केली.



शर्माने ६८ चेंडूत १३५ धावांची आकर्षक खेळी केली. त्यात त्याने तब्बल १० चौकार आणि १० षटकार मारले. तर क्लासेनने १३ चेंडूत ३७ धावा फटकावल्या. निर्धारित २० षटकात हैदराबादने दोन गडी गमावून २४२ धावांचा डोंगर उभा केला.

विशालकाय लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरूवात खराब झाली. पथुन निसंका ८ धावांवर बाद झाला. मात्र त्यानंतर नितीश राणा व केएल राहुल यांनी सरासरी दहा धावांच्या गतीने धावा करत डाव सावरला होता. हे दोघे खेळत असताना दिल्ली कदाचित विजयी लक्ष्य गाठेल असे वाटत होते. मात्र राहुला हुसेनने ३७ धावांवर बाद केले. त्यानंतर लगेचच राणालाही मलिंगाने बाद केले. त्याने शानदार अर्धशतकी खेळी केली. पुढच्याच चेंडूवर अनुभवी डेव्हीड मिलरलाही त्याने शून्यावर बाद केले आणि हैदराबादच्या विजयाची वाट सोपी केली. त्यानंतर फक्त विजयाची औपचारिकता बाकी राहिली होती. समीर रिझवी, ट्रिस्टन स्टब्ल यांनी थोडाफार प्रतिकार केला. मात्र ते संघाचा पराभव टाळू शकले नाहीत. हैदराबादकडून मलिंगा सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ३२ धावात चार गडी बाद केले, तर हर्ष डुबेने तीन गड्यांना बाद करण्यात यश मिळवले. निर्धारित २० षटकात दिल्लीला १९५ धावाच करता आल्या. त्यासाठी त्यांना ९ गड्यांचे मोल द्यावे लागले.

दैनिक
# जनता आवाज
अहिल्यानगर गुरूवार, दि. २३ एप्रिल २०२६ पान नं. ८

## जवान शिंदेंवर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार



जनता आवाज वृत्तसेवा

**करंजी :** पाथर्डी तालुक्यातील श्रीक्षेत्र दगडवाडी गावचे सुपुत्र सुभेदार बबन दत्तात्रय शिंदे यांचे पंजाब राज्यातील अमृतसर या ठिकाणी ड्युटीवर असताना मंगळवारी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने निधन झाल्याने संपूर्ण दगडवाडी गावासह परिसरावर शोककळा पसरली आहे.

बुधवारी सकाळी पुणे येथून त्यांचे पार्थिव अहिल्यानगर मार्गे दगडवाडीत पोहोचले. सकाळी नऊ वाजता त्यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी अंत्यदर्शनासाठी ठेवले. त्यानंतर सजवलेल्या रथातून त्यांचे पार्थिव स्मशानभूमीपर्यंत आणन्यात आले. त्या ठिकाणी अहिल्यानगर पोलीस मुख्यालयाच्या वतीने हवेत तीन फायर करून मानवंदना देण्यात आली. त्यानंतर अहिल्यानगर आर्मी सेंटरच्या वतीने देखील तीन राऊंड हवेत फायर करून सुभेदार बबन शिंदे यांना मानवंदना देण्यात आली.

यावेळी गावच्या वतीने सरपंच सुभाष शिंदे, जिल्हा प्रशासनाच्या वतीने तहसीलदार डॉक्टर उद्धव नाईक, जिल्हा सैनिक बोर्डच्या वतीने चंद्रकांत भगत, जिल्हा सहकारी बँकेचे संचालक अक्षय कर्डिले, दगडवाडीसह परिसराच्या वतीने महंत ज्ञानेश्वर महाराज कराळे यांनी सुभेदार बबन शिंदे यांच्या पार्थिवास पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण केली. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, भाऊ, आई असा परिवार आहे. अतिशय गरीब कुटुंबातून पुढे आलेले सुभेदार बबन शिंदे यांच्या निधनामुळे परिसरातून मोठी हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मेनरोडवरील दुकाने हटवण्याच्या चर्चेने खळबळ

## ना. राम शिंदे व आ. रोहित पवार आमने-सामने

जनता आवाज वृत्तसेवा

**कर्जत :** कर्जत शहरातील मेन रोडवर बेशिस्त वाहन चालक, रस्त्यामध्ये लावण्यात येणारे चार चाकी व दुचाकी वाहने, व अवजड वाहनांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या पार्श्वभूमीवर दुकाने हटवण्याच्या शक्यतेवरून राजकीय वातावरण तापले आहे. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी कर्जत शहरातील एका खाजगी कार्यक्रमात ''वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी भविष्यात भक्कम पाऊल उचलू'' असे विधान केल्यानंतर व्यापाऱ्यांमध्ये संभ्रम आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.



राम शिंदे यांच्या वक्तव्यातील ''भक्कम पाऊल'' या शब्दप्रयोगाचा अर्थ काय, यावरून शहरात विविध चर्चा रंगल्या आहेत. मेनरोडवरील दुकाने हटवली जाणार का, असा प्रश्न व्यापाऱ्यांना पडला असून, लहान व्यवसायिकांच्या उपजीविकेवर गदा येईल, अशी भीती व्यक्त केली जात आहे. अनेकांनी बँकांची कर्ज काढून किंवा शेत जमिनी विकून व्यवसाय सुरू केले आहे. सर्वजण शेतकरी कुटुंबातील आहे. आणि विशेष म्हणजे सुशिक्षित बेरोजगार आहे. सरकारकडे कोणतीही नोकरीचे धोरण नसल्यामुळे व शहरी भागामध्ये कमी पगारात काम करावे लागत असल्याने अनेक युवकांनी मेन रोडवर विविध व्यवसाय सुरू केले आहेत.

आपला व्यवसाय बंद पडला तर आपण काय करणार एक तर प्रचंड महागाई वाढलेली आहे. कर्जतची बाजारपेठ ही उलाढाल फार मोठ्या प्रमाणामध्ये कमी झाली आहे. एमआयडीसी किंवा इतर कोणताही उद्योग शहराजवळ नसल्यामुळे व्यवसाय वाढीस चालना मिळत नाही. अशा पद्धतीने दुकाने काढली तर आपला प्रपंच उध्वस्त होणार, अशा भीतीमध्ये असणाऱ्या सर्व व्यापाऱ्यांना आमदार रोहित पवार यांनी मात्र दिलासा दिला आहे.

दरम्यान, या मुद्द्यावर आमदार रोहित पवार यांनी तीव्र प्रतिक्रिया देत व्यापाऱ्यांना दिलासा दिला आहे. कर्जत येथील एसटी बसस्थानक परिसरातील कामांची पाहणी करताना त्यांनी सांगितले की, गरीबाच्या पोटावर तुम्ही पाय देणार काय? मग तुमच्या पदाचे काय लोणचे घालायचे का? तुम्हाला जर पदाचा वापर करायचा असेल तो मतदार संघामध्ये निधी आणण्यासाठी प्रयत्न करा. प्रशासकीय इमारतींच्या कामाला निधी मिळू देत नाही. हे सर्व लोकांना समजते असे म्हणत रोहित पवार यांनी अशा पद्धतीने राम शिंदे यांच्या वक्तव्याचा चांगलाच समाचार घेतला आहे.

# अल्पवयीन मुलीला लग्नासाठी धमकी

## नेवाशात लव्ह जिहादचा प्रकार उघड!

जनता आवाज वृत्तसेवा



**नेवासा :** नेवासा शहरात एका अल्पवयीन हिंदू मुलीवर झालेल्या अत्याचार आणि विनयभंगाच्या घटनेने संतापाची लाट उसळली आहे. गल्लीतच राहणाऱ्या एका नराधमाने घरात घुसून मुलीचा विनयभंग तर केलाच, पण ''गजवा-ए-हिंद माझे टार्गेट आहे'' असे म्हणत पीडितेला लग्नासाठी धमकावल्याने या घटनेला लव्ह जिहादचा गंभीर प्रकार असल्याचे समोर येत आहे.

दि. २१ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेच्या सुमारास पीडित मुलगी घरी एकटी असल्याची संधी साधून आरोपी आदिल अय्युब सय्यद (रा. नेवासा) याने बेल वाजवून घरात जबरदस्तीने प्रवेश केला. आरोपीने पीडितेशी अश्लील चाळे करून तिला मिठीत ओढले आणि लग्नासाठी पळवून नेण्याचा प्रयत्न केला. पीडितेने आरडाओरडा केला असता, आरोपीने तिला ''तू माझ्याशी लग्न केले नाही तर तुझ्या घरच्यांना संपवून टाकीन'' अशी उघड धमकी दिली. एका १३ वर्षीय मुलीला अशा प्रकारे धाक दाखवणे, हे मोठ्या षडयंत्राचा भाग असल्याचे बोलले जात आहे.

पीडितेची आई लग्नावरून घरी परतली. मुलीचा आरडाओरडा ऐकून त्यांनी तात्काळ मामाला मदतीला बोलावले. आरोपीने स्वतःला आतून कोंडून घेतले होते, मात्र नातेवाईकांनी प्रसंगावधान राखून युक्तीने दरवाजा उघडायला लावला. दरवाजा उघडताच आरोपीने मामाला धक्का देऊन तिथून पळ काढला, मात्र जातानाही ''तुमचे जगणे मुश्किल करून टाकीन'' अशी धमकी दिली.

### आरोपीवर अनेक कलमान्वये गुन्हे

नेवासा पोलिसांनी घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आरोपी आदिल शेख याला तातडीने बेड्या ठोकल्या आहेत. त्याच्यावर पोक्सो, विनयभंग, लैंगिक अत्याचार, अनधिकृत प्रवेश आणि जीवे मारण्याची धमकी या व इतर कलमान्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या घटनेमुळे नेवासा येथील हिंदू संघटना आणि स्थानिक नागरिकांनी अत्यंत आक्रमक पवित्रा घेतला असून, आरोपीवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# बापट पतसंस्थेच्या ठेवीदारांचे आंदोलन

## संस्थापक विजय औटींच्या घरासमोर आज उपोषण!

जनता आवाज वृत्तसेवा

**पारनेर :** तालुक्यातील हजारो सामान्य आणि कष्टकऱ्यांच्या ठेवी गायब करणाऱ्या पारनेर येथील सेनापती बापट मल्टिस्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या विरोधात आता ठेवीदारांनी निकाराची लढाई लढण्याचा निर्णय घेतला आहे.

पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होऊनही मुख्य आरोपी मोकाट असल्याने, या प्रकरणातील दोषींना तात्काळ अटक करावी आणि ठेवीदारांचे पैसे परत मिळावेत, या मागणीसाठी आज गुरुवारी संस्थेचे संस्थापक माजी आमदार विजय औटी यांच्या निवासस्थानासमोर पारनेर बाजार तळावर एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्याचा इशारा ठेवीदारांनी दिला आहे. यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना सविस्तर निवेदन पाठवून परवानगीची मागणी करण्यात आली आहे.

सेनापती बापट मल्टिस्टेट सोसायटीच्या विरोधात गुन्हा दाखल आहेत. संस्थेच्या २९ शाखांमधून शेकडो कोटींच्या ठेवी जमा करण्यात आल्या होत्या. मात्र, ठेवींची मुदत संपूनही पैसे मिळत नसल्याने सर्वसामान्य ठेवीदार आर्थिक संकटात सापडले आहेत. जिल्हा सत्र न्यायालयाने संचालक आरोपींचे जामीन फेटाळले असतानाही पारनेर पोलीस प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा गंभीर आरोप ही ठेवीदारांनी केला आहे.

### औटींच्या विरोधात ठेवीदार आक्रमक

लोकप्रतिनिधी म्हणून जनतेची व त्यांच्या मालमत्तेची रक्षण करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर होती, त्यांच्याच संस्थेने आज सामान्य जनतेला रस्त्यावर आणले आहे. शेकडो कोटींचा घोटाळा होऊनही संस्थापक विजय औटी मूग गिळून गप्प का आहेत? केवळ गुन्हे दाखल होऊन उपयोग नाही, तर आमच्या कष्टाचा पैसा परत मिळेपर्यंत हा लढा थांबणार नाही. जनता त्या राजकारण्यांना धडा शिकवेल, असे मत संतप्त ठेवीदार व्यक्त करत आहेत.

# अतिक्रमण हटविण्यास प्रशासनाचा विलंब

## त्रिदल संघटनेचे मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

जनता आवाज वृत्तसेवा

**पाथर्डी :** पाथर्डी नगरपरिषद हद्दीतील आनंदनगर येथील गट क्रमांक १७७/१ मधील प्लॉट क्रमांक २९, ३० व ३१ समोरील ओपन स्पेसवर झालेल्या अतिक्रमणाबाबत नगर परिषद प्रशासनाने अद्यापही ठोस कार्यवाही न केल्याने त्रिदल संघटनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. यासंदर्भात पाथर्डी नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांना शेवटचे निवेदन देत, आठ दिवसांत अतिक्रमण हटविले नाही तर नगरपालिकेसमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा संघटनेकडून देण्यात आला आहे.




संघटनेचे अध्यक्ष गोवर्धन गर्जे व सचिव सुधाकर आव्हाड यांच्या स्वाक्षरीने सादर करण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या प्रकरणी यापूर्वी २४ एप्रिल २०२५ रोजी अर्ज तसेच त्यानंतर स्मरणपत्रे देण्यात आली होती. त्यानुसार नगर परिषदेकडून ४ जानेवारी २०२६ रोजी अतिक्रमण हटविण्याची कारवाई करण्यात आली होती. मात्र ही कारवाई अपुरी ठरली असून संबंधित जागेवरील अतिक्रमण पूर्णतः हटविण्यात आले नाही. ज्या ठिकाणी अतिक्रमण काढण्यात आले होते, त्या ठिकाणी संबंधितांनी पुन्हा कब्जा केला आहे. तसेच संबंधितांनी त्यांच्या घराचा मूळ पश्चिमेकडील रस्ता बंद करून पूर्वेकडील ओपन स्पेसकडून नव्याने दरवाजे काढून त्या जागेचा वहिवाटीसाठी वापर सुरू केला असल्याचा आरोपही संघटनेने केला आहे.

# पश्चिमेचे पाणी गोदावरीत वळविण्याबाबत अंतिम मुदत

जनता आवाज वृत्तसेवा

**कोपरगाव :** सह्याद्री घाटमाथ्यावरून पश्चिमेकडे अरबी समुद्रात वाहून जाणारे अतिरिक्त पाणी गोदावरीच्या तुटीच्या खोऱ्यात वळविण्याबाबत दाखल जनहित याचिकेवर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने केंद्र व राज्य सरकारला ८ मे २०२६ पर्यंत प्रतिज्ञापत्र सादर करण्याची अंतिम संधी दिली आहे. कामासाठी वेळापत्रक व आर्थिक तरतूद स्पष्ट करण्याचे निर्देश न्यायमूर्ती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती अजित कडेठाणकर यांनी दिले आहेत. या निर्णयाचे शेतकरी संघटना व निळवंडे कालवा कृती समितीने स्वागत केले आहे.

शेतकरी संघटनेचे नानासाहेब जवरे व रूपेंद्र काले यांनी ५ जानेवारी २०२४ रोजी जनहित याचिका दाखल केली होती. सरकारकडून वारंवार प्रतिसाद न मिळाल्याने सुनावणीदरम्यान ॲड. अजित काळे यांनी न्यायालयाचे लक्ष वेधले. कोकणातील नार-पार, दमणगंगा, वैतरणा, उल्हास आदी खोऱ्यात ३१७ टीएमसी अतिरिक्त पाणी उपलब्ध असून त्यातील ८९.९२ टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याची योजना असल्याचे याचिकेत नमूद करण्यात आले आहे.

समितीच्या अहवालानुसार प्रवाही व उपसा नदीजोड योजनांद्वारे सुमारे २२.९ टीएमसी पाणी वळविण्याचा प्रस्ताव आहे. त्यापैकी एकट्या प्रवरा खोऱ्यासाठी १५ टीएमसी पाणी प्रस्तावित असून निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्राला बारमाही सिंचनाचा मोठा दिलासा मिळू शकतो. ३० प्रवाही वळण योजना, ५ बांधकामाधीन आणि ११ भविष्यकालीन योजनांद्वारे गोदावरी खोऱ्यात पाणी वळविण्याची आखणी करण्यात आली आहे.

राज्याने २०१९ मध्ये स्थापन केलेल्या समितीनेही नदीजोड प्रकल्पांना मान्यता दिली असली तरी कामाचा वेग मंद असल्याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली. काही योजनांना प्रशासकीय मान्यता, संभाव्यता अहवाल व सविस्तर प्रकल्प अहवाल पूर्ण झाले असल्याची माहिती याचिकाकर्त्यांनी दिली.

# डिलिमिटेशनची प्रक्रिया सुरू होणे गंभीर बाब

## माजी मंत्री थोरात; महिला आरक्षणाबाबत पत्रकार परिषद

जनता आवाज वृत्तसेवा

**संगमनेर :** सरकारने जनगणनेऐवजी डिलिमिटेशनची प्रक्रिया सुरू केली आहे, ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रीया माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी व्यक्त केली.

नाशिक शहरातील शिवनेरी शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत महिला आरक्षणाच्या संदर्भात संबोधित केले यावेळी ते म्हणाले की, या आधी महिला आरक्षणाच्या मुद्द्यावर राहुल गांधी यांनी स्पष्टपणे मांडणी केली होती की, या आरक्षणामध्ये सर्व समाजघटकांना समान संधी मिळाली पाहिजे. २०२४ च्या निवडणुकांनंतर तात्काळ जातीनिहाय जनगणना केली जाईल, असेही सांगण्यात आले होते. मात्र, दोन वर्ष उलटून गेल्यानंतरही जनगणना झालेली नाही. उलट, जनगणनेला प्राधान्य न देता सध्या डिलिमिटेशनची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे, ही गंभीर बाब आहे.

महिला आरक्षणाला काँग्रेस पक्षाने आणि विरोधी पक्षांनी कधीही विरोध केलेला नाही. मात्र, डिलिमिटेशन प्रक्रियेला आमचा ठाम विरोध आहे. २०२३ मध्ये ज्या पद्धतीने महिला आरक्षणाचा निर्णय घेण्यात आला, त्याच पद्धतीने पारदर्शक आणि न्याय्य अंमलबजावणी व्हावी, ही आमची भूमिका आहे.




महिला आरक्षणाची संकल्पना राजीव गांधी पंतप्रधान असताना मांडण्यात आली होती. त्यानंतर काँग्रेस सरकारच्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना ३३ टक्के आरक्षण देऊन त्यांना राजकीय मुख्य प्रवाहात आणण्याचे ऐतिहासिक काम करण्यात आले. महिलांचे सशक्तीकरण व्हावे, त्यांच्या हक्कांना बळ मिळावे यासाठी काँग्रेस पक्ष आणि विरोधी पक्षांनी सातत्याने प्रयत्न केले आहेत.

# शहर विकासाला काळे गटाचा विरोध

जनता आवाज वृत्तसेवा



**कोपरगाव :** नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेसाठी काळे गटाचे नगरसेवक अनुपस्थित राहून त्यांनी शहराच्या विकासात्मक निर्णयाला त्यांचा विरोध असल्याचेच स्पष्ट केले आहे. स्वतःच्या कार्यकर्त्याने स्वामी समर्थ केंद्र प्रमुखाला अरेरावी करून धार्मिक ठिकाणी केलेल्या वादाला 'उलटा चोर कोतवाल को दाटे' अशी भूमिका घेत खरा चेहरा काळे गटाचा उघडा पडला आहे.

जर एखाद्या कार्यकर्त्याच्या वैयक्तिक भूमिकेमुळे संपूर्ण शहर विकासाचे प्रश्नाचे ठराव संमत होत असताना काळे गटाचे नगरसेवकांनी अप्रत्यक्ष विरोध दर्शविला आहे.शहराची शांतता भंग करण्याचे काम कोण करते हे शहराला ठाऊक आहे. त्यामुळे कायदेशीर कारवाई देखील कुणावर झालेल्या आहेत हे पत्रकार परिषद घेऊन खोटे आरोप करणाऱ्यांनी एकदा अंतर्मुख होऊन बघावे.

गेले चार वर्षातील अनेक कामात अनियमितता आणि गैरव्यवहार झाल्याचे जाणवते आहे. मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार देखील झाला आहे त्याची चौकशी होण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते करत आले आहे.यामुळे श्वेतपत्रिका काढून हा गैरव्यवहार बाहेर येईल म्हणून भीतीपोटी कुणाच्या आदेशावरून नगरसेवक उपस्थित राहिले नाही हे सांगण्याची गरज नाही.

# डोंगर पेटवून पर्यावरणाचे नुकसान करू नका

## डोंगर पेटवणाऱ्यांवर कारवाई का होत नाही: तांबे

जनता आवाज वृत्तसेवा

**संगमनेर :** महाराष्ट्रात गेल्या २० वर्षापासून सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात (दादा) यांनी सुरू केलेले दंडकारण्य अभियान ही वृक्ष लागवडीची चळवळ जयहिंद लोकचळवळ व सहकारी संस्था, ग्रामस्थांच्या पुढाकारातून चालूच आहे. मात्र मागील काही दिवसांपासून डोंगरांना आग लागण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले असून वन विभाग गप्प का आहे? दोशींवर कारवाई का होत नाही? असा सवाल करताना पर्यावरणाची हानी करणाऱ्यांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दुर्गाताई तांबे यांनी दिला आहे.

याबाबत दिलेल्या प्रसिद्ध पत्रकात दुर्गाताई तांबे यांनी म्हटले आहे की, संगमनेर तालुक्यात २५० डोंगर व २०० दऱ्या आहेत. हा तालुका डोंगरी आहे. माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आ. डॉ सुधीर तांबे यांच्या मार्गदर्शनाने ही चळवळ खूप उत्तम प्रकारे चालू आहे. नवनवीन संकल्पनेतून ही चळवळ नाशिक जिल्ह्यात सप्तशृंगी गड या ठिकाणी चालू आहे. परंतु अनेक वर्षांपूर्वी पासून खांडगाव येथील कपारेश्वर या डोंगरावर अनेकवेळा विकृत कृतीतून मोठमोठे वृक्ष, वड, पिंपळ, उंबर, आंबा या झाडांना आग लावण्यात आल्या. त्यात एका वेळी ४०० ते ५०० वृक्ष जळाले.तक्रार करूनही कुणालाही शिक्षा होत नाही.



मागील महिन्यात सायखिंडीच्या दऱ्या, वाऱ्या डोंगरावर भर दुपारी एक दीड किलोमीटर लांबीची आग लागली. सर्वांनी आरडाओरडा करूनही माणसं उशिरा पोहोचले कारण खूप उंच डोंगर आहे. दंडकारण्याची २० वर्षापासूनचे लावलेले झाडे त्यात होरपळून गेली. त्यानंतर मालदाडच्या मच्छिंद्रनाथ गडावर आग लागली. परंतु पाणी असल्याने गावच्या तरुणांनी जीव धोक्यात घालून ती आग विझवली तरी २५ टक्के झाडे जळालीच. पुन्हा कालच दंडकारण्य अभियान मधून सप्तशृंगी गडावर लावलेली ६४ हजार झाडांना आग लागली. २५ टक्के झाडे त्यात होरपळली.

### वनविभाग कारवाई का करीत नाही

सतत लागणाऱ्या आगीमुळे पर्यावरण धोक्यात आले आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर लागणारे आगीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी वन विभाग नेमकी करते काय आहे?ही केवळ झाडांची हानी नाही तर पर्यावरणाचा खून आहे .आता जर प्रशासनाने तात्काळ कठोर कारवाई केली नाही तर हे जन आंदोलन तीव्र करण्याशिवाय पर्याय उरणार नाही. वन विभाग झोपला आहे का?या यामधील दोशींना का वाचवलं जात आहे? असा खडा सवाल दंडकारण्य अभियानाच्या प्रकल्प प्रमुख दुर्गाताई तांबे यांनी वन विभागाला

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डींग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्ताटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ RNI No. MAHMAR/2022/85155. This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028, RNI No. MAHMAR/2022/85155.